सोलापूर
तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

लातूर | मंगळवार, ३० जून २०२६ । वर्ष ४ थे अंक १११ । पाने १२ । किंमत रु. ८/- | RNI No. MAHMAR/2023/86477 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026. | dainiktarunbharat.com | epaper.dainiktarunbharat.com

विचारपुष्प



लोकांच्या कल्याणासाठी सचोटीने, अगदी आवश्यक तेवढाच नफा घेऊन आणि विशुद्ध वस्तूचाच व्यापार करणे हाही तसा उदात्त स्वार्थ साधणाराच व्यवहार आहे. तो परोपकारी आहे, खरे समाधान व सुख देणारा आहे.

- स्व. एकनाथ रानडे
रा. स्व. संघाचे पूर्व सरकार्यवाह, संस्थापक विवेकानंद शिला स्मारक व विवेकानंद केंद्र, कन्याकुमारी

नसरापूरच्या नराधमाला फाशी

विशेष न्यायाधीश एस. आर. साळुंखे यांचा ऐतिहासिक निर्णय


पुणे : नसरापूर येथे साडेतीन वर्षांच्या चिमुकलीवर अत्याचार करून तिचा निर्घृण खून करणारा नराधम भीमराव कांबळे याला विशेष न्यायालयाने फाशीची शिक्षा सुनावली. विशेष न्यायाधीश एस. आर. साळुंखे यांनी सोमवारी हा ऐतिहासिक निकाल दिला. या प्रकरणात गुरुवार, २५ जून रोजी आरोपीला दोषी ठरवण्यात आले होते. त्यानंतर फाशी की जन्मठेप, यावरील निर्णय गुरुवारी राखून ठेवण्यात आला होता. न्यायालयाने हा गुन्हा दुर्मिळातील दुर्मिळ स्वरूपाचा मानत आरोपीला मृत्युदंडाची शिक्षा सुनावली आहे.

या प्रकरणातील सर्वांत उल्लेखनीय बाब म्हणजे गुन्हा घडल्यापासून अवघ्या दोन महिन्यांत तपास, दोषारोपपत्र, सुनावणी आणि अंतिम निकालाची प्रक्रिया पूर्ण झाली. पोलिसांनी गुन्ह्यानंतर तातडीने तपास सुरू करत आरोपीला अटक केली.

घटनास्थळावरील भौतिक पुरावे, सीसीटीव्ही चित्रफिती, तांत्रिक तपास, न्यायवैद्यकीय अहवाल आणि साक्षीदारांच्या जबाबांच्या आधारे आरोपीविरुद्ध भक्कम पुरावे गोळा करण्यात आले. गुन्हा दाखल झाल्यानंतर केवळ १५ दिवसांत तब्बल १ हजार २०० पानांचे दोषारोपपत्र न्यायालयात दाखल करण्यात आले.

सरकारी पक्षाने न्यायालयासमोर परिस्थितिजन्य आणि वैज्ञानिक पुराव्यांची अखंड साखळी उभी केली. आरोपीने अल्पवयीन मुलीवर अत्यंत पावशी पद्धतीने लैंगिक अत्याचार करून तिचा खून केल्याचे न्यायालयात सिद्ध करण्यात यश आले. हा गुन्हा ''दुर्मिळातील दुर्मिळ'' स्वरूपाचा असल्याचा युक्तिवाद सरकारी पक्षाने केला होता. बचाव पक्षाचा युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर न्यायालयाने आरोपीला कठोर शिक्षा सुनावली.

सुनावणीदरम्यान आरोपीने, ''मी शेडमध्ये गेलो असता मुलगी आली. तिला शेव खाण्यास दिली. गोठ्यात नेताना माझा पाय घसरल्याने तिच्या डोक्याला मार लागला आणि ती रडू लागली. लोक आपल्यावर संशय घेतील म्हणून तिला तिथेच सोडून निघून गेलो,'' असा बचाव करण्याचा प्रयत्न केला. मात्र, न्यायालयाने उपलब्ध वैज्ञानिक आणि परिस्थितिजन्य पुराव्यांच्या आधारे हा दावा फेटाळून लावला. ◂ (तभा वृत्तसेवा)



या कलमांनुसार सुनावली शिक्षा



भारतीय न्याय संहितेच्या कलम १३७ (२) (अपहरण), ६४ व ६५ (बलात्कार), १०३ (खून), ७४ (विनयभंग करण्याच्या उद्देशाने बळजबरी करणे), १४० (१) यांसह लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्याच्या (पोक्सो) कलम ४, ६, ८, १२ या कलमांनुसार दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. या सर्व कलमांनुसार न्यायालयाने कांबळे याला शिक्षा सुनावली आहे. ■

हे ठरले निर्णायक पुरावे

- गुन्ह्यापूर्वी आरोपीने घटनास्थळ व परिसराची केलेली रेकी.
- मुख्य व बाल साक्षीदारांचे जबाब.
- घटनास्थळ पंचनामे, ओळख परेड आणि जप्त मुद्देमाल.
- न्यायवैद्यकीय प्रयोगशाळेचे वैज्ञानिक अहवाल.
- पुराव्यांची अखंड 'चेन ऑफ कस्टडी' सिद्ध होणे.
- सीसीटीव्ही फुटेज आणि तांत्रिक तपास.
- वैद्यकीय पुरावे.
- ५५ साक्षीदारांचे जबाब.
- घटनास्थळाची ५० हून अधिक छायाचित्रे. ■

नसरापूरचा निकाल
(अग्रलेख पान ४ वर)

वेगवान न्यायदानाचा नवा 'बेंचमार्क'

मुख्यमंत्री फडणवीस यांचे विधानसभेत निवेदन

मुंबई, २९ जून

पुणे जिल्ह्यातील नसरापूर येथे अल्पवयीन मुलीवरील अत्याचार आणि हत्येच्या प्रकरणात ५९ दिवसांत न्यायप्रक्रिया पूर्ण करत न्यायालयाने आरोपीला तिहेरी फाशीची शिक्षा सुनावून वेगवान न्यायदान देऊन नवीन बेंचमार्क तयार केला असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत निवेदनाद्वारे दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी न्यायप्रक्रियेतील संपूर्ण घटनाक्रमाची माहिती देऊन या प्रकरणात १६ दिवसांत ५५ साक्षीदारांच्या साक्षी, तपासणी आणि उलटतपासणीची प्रक्रिया पूर्ण करण्यात आल्याचे सांगितले. २५ जून २०२६ रोजी न्यायालयाने आरोपीला दोषी ठरविले आणि २९ जून २०२६ रोजी तिहेरी फाशीची शिक्षा सुनावली. घटना घडल्यानंतर अवघ्या ५९ दिवसांत संपूर्ण न्यायप्रक्रिया पूर्ण होऊन शिक्षा झाल्याने हा न्यायव्यवस्थेतील महत्त्वाचा टप्पा ठरला आहे. न्यायमूर्ती एस. आर. साळुंखे यांनी सातत्यपूर्ण सुनावणी घेत वेगवान न्यायदानासाठी पुढाकार घेतला. अशा गंभीर गुन्ह्यांमध्ये वेळेत न्याय मिळणे अत्यंत आवश्यक असून न्यायालयाने या प्रकरणातून नवा बेंचमार्क निर्माण केला आहे. ◂ (तभा वृत्तसेवा)



मी न्यायाधीशांचे मनापासून अभिनंदन करतो. बालिकाबरोबर अत्याचार आणि हत्या अशाप्रकारचे दुर्मिळ प्रकरण महाराष्ट्रात घडले. पण न्यायालयाने जलद गतीने निर्णय दिला. हा बेंचमार्क निकाल आहे. अशाप्रकारचे कृत्य करायला आता कोणी धजावणार नाही. पोलिसांनीही २ आठवड्यांत आरोपपत्र दाखल केले. पोलिसांनी योग्य तऱ्हेने पुरावे सादर केले. कुठेही गुन्हेगाराला सुटण्याची संधी मिळाली नाही,

एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री



नसरापूर येथील चिमुकलीच्या बलात्कार व हत्येच्या प्रकरणात दिलेला निर्णय हा न्यायव्यवस्थेवरील विश्वास अधिक दृढ करणारा आहे. अमानुष कृत्यांना समाजात कोणतीही जागा नाही. प्रत्येक महिला व मुलीची सुरक्षितता ही शासनाची सर्वोच्च प्राथमिकता आहे. न्याय मिळाला, पण अशी घटना पुन्हा घडू नये यासाठी समाज आणि प्रशासनाने एकत्रितपणे अधिक सजग राहण्याची गरज आहे.

सुनेत्रा पवार, उपमुख्यमंत्री



मी समाजाचा एक भाग म्हणून नसरापूर अत्याचार प्रकरणात मृत्यू झालेल्या मुलीची माफी मागते. समाजात आनंदाने हसत-खेळत असलेल्या या मुलीवर एका विकृतीने क्रूर अत्याचार करून तिचा खून केला. एवढ्यावरच न थांबता मृत्यूनंतर देखील त्याने त्याची विकृती दाखवली. मी एक आई आणि पोलिस अधिकारी म्हणून मुलीच्या मृत्यूनंतर तिला न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला.

- विजयमाला पवार
वरिष्ठ पोलिस निरीक्षक आणि तपास अधिकारी

कायदा आणि न्यायव्यवस्था मजबूत नाही, असा समज जनमानसात आहे. त्यामुळेच आरोपी निर्दोष सुटतात असे प्रत्येकाचे मत होते. मात्र, आज न्यायालयाने दिलेला निकाल हा कायदे आणि न्यायव्यवस्था किती मजबूत आहे हे अधोरेखित करतो. नसरापूर प्रकरणात न्यायालयाने दिलेला निकाल हा न्यायव्यवस्था आणि संविधानाचा विजय आहे.

ॲड. विपुल दुशिंग, ॲड. मनीष पाडेकर
मूळ फिर्यादी यांचे वकील

सत्र न्यायालयाने दिलेला हा निकाल अत्यंत समाधानकारक आहे. या निर्णयाची अंमलबजावणी झाल्यानंतर आणखी समाधान लाभणार आहे. या निकालातून समाजात एक संदेश गेला आहे की, अशा प्रकारचा गुन्हा केला तर न्यायव्यवस्था त्याला सोडणार नाही. अशा गुन्ह्यांना फाशी हीच शिक्षा आहे.

पीडित मुलीचे वडील

महत्त्वाचे

सलग दोन दिवसांच्या तेजीला ब्रेक

मुंबई : शेअर बाजारातील सलग दोन दिवसांच्या तेजीला सोमवारी ब्रेक लागला. सर्वच क्षेत्रांतील चौफेर विक्री आणि व्यापक बाजारातील घसरणीमुळे गुंतवणूकदारांचे मनोधैर्य खचले, परिणामी निफ्टी दिवसाच्या नीचांकी पातळीजवळ बंद झाला.सत्राच्या पहिल्या सत्रात बाजार एका मर्यादित कक्षेत व्यवहार करत होता. मात्र दुपारनंतर नफावसुलीचा जोर वाढला. यामुळे निफ्टी घसरून २३,९२४ या सत्रातील नीचांकी पातळीवर पोहोचला. ऑटो, आयटी, ऑइल अँड गॅस आणि बँकिंग समभागांमधील विक्रीमुळे बाजारावर मोठा दबाव आला. तर व्यापक बाजारातील कमकुवतपणाने घसरणीत अधिक भर घातली.

टेम्पो उलटून क्लिनर जागीच ठार

सोलापूर, दि. २९ जून-

भर वेगातील आयशर टेम्पो उलटून झालेल्या अपघातात टेम्पोचा क्लिनर जागीच ठार झाल्याची घटना मोहोळ-कामती रस्त्यावरील ढोक बाभुळगाव येथे सोमवार, दि.२९ जून २०२६ रोजी घडली. प्रदीप परमेश्वर पवार (वय-२९, रा. तांबोळे, ता.मोहोळ) असे मयताचे नाव आहे. प्रदीप पवार हा सोमवारी दुपारच्या सुमारास मोहोळकडून कामतीच्या दिशेने येत होता. ढोक बाभुळगाव पाटीजवळ टेम्पोचालकाचा वाहनावरील ताबा सुटुन टेम्पो उलटला. यात प्रदीप पवार हा गंभीर जखमी झाल्याने त्याला नबीलाल तांबोळी यांनी सोलापूर येथील शासकीय रुग्णालयात उपचारार्थ दाखल करण्यात आले होते. मात्र, डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

पिकअप वाहन पलटी; सात बांधकाम मजूर जखमी

सोलापूर, दि.२९ जून-

पिकअप वाहन पलटी झाल्याने मध्य प्रदेश येथे राहणारे सात बांधकाम मजूर जखमी झाल्याची घटना सोमवार, दि.२९ जून २०२६ रोजी सोलापूर-मोहोळ मार्गावरील कोळेगावजवळ घडली. लालरुपसिंग डावर (वय-१८), विक्रम रमेश मानकर (वय-१७), कमल सुरुपाल ठाकूर (वय-२३), संजय सुमरिया सोलंकी (वय-२२) सावन सुमरिया सोलंकी (वय-२३), अजय जयराम वासकेले (वय-२३), देवा पप्पू चव्हाण (वय-१३) अशी जखमींची नावे आहेत.ते सर्वजण मोहोळकडून सोलापूरकडे महिंद्रा पिकअपमधून सोबत स्लॅब घालण्याची मिक्सर येऊन निघाले असताना कोळेगावच्या उतारावर पाठीमागून येणाऱ्या अज्ञात वाहनाने मिक्सर मशीनला कट मारला. त्यामुळे चालकाचे नियंत्रण सुटल्याने पिकअप पलटी झाली. यात वरील सर्वजण जखमी झाले.

टीईटी पेपरफुटीवर विधानसभेत गोंधळ

सरकारला विरोधकांनी धरले धारेवर



पावसाळी अधिवेशन

मुंबई, २९ जून

राज्याच्या शिक्षक पात्रता परीक्षा २०२६ च्या पेपरफुट प्रकरणाचे सोमवारी विधानसभेत जोरदार पडसाद उमटले. या मुद्यावरून विरोधकांनी सरकारला चांगलेच धारेवर धरले. याप्रकरणी तीन आरोपींना अटक करण्यात आली आहे. प्रकणाच्या तपासासाठी विशेष चौकशी पथक तयार करण्यात आले असून दोषी आढळणाऱ्या सर्वांवर संघटित गुन्हेगारी कायदा (मकोका) अंतर्गत गुन्हा नोंदवण्याबाबत आवश्यक बदल करण्यासाठी तपासणी केली जाणार आहे, असे निवेदन शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी सभागृहात दिले.

२८ जून २०२६ रोजी होणाऱ्या टीईटी परीक्षेची प्रश्नपत्रिका विकण्यासाठी काही लोक येणार असल्याची माहिती पोलिसांना २७ जून रोजी मिळाली होती. या माहितीची खातरजमा करत पोलिसांनी सापळा रचून प्रश्नपत्रिका विक्रीस येणाऱ्या तीन व्यक्तींना ताब्यात घेतले. या व्यक्तींकडे आढळलेली कागदपत्रे २८ जूनच्या टीईटी परीक्षेचीच प्रश्नपत्रिका असल्याचे शिक्षण विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी खात्री केल्यानंतर स्पष्ट झाले, अशी माहिती भुसे यांनी दिली. तिन्ही आरोपींविरूद्ध कोनगाव पोलीस ठाणे, भिवंडी, ठाणे शहर पोलीस आयुक्तालय येथे २७ जून रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. भारतीय न्याय संहिता कलम ३१८(४), ३१६(५), ६१(२), महाराष्ट्र स्पर्धा परीक्षा (अनुचित मार्गास प्रतिबंध) अधिनियम २०२४ चे कलम ११(१)(२)(३), १२(१)(२) आदी कलमांतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. ◂ (तभा वृत्तसेवा)

बिहार, हरयाणा, बिहारला पथके रवाना

गुन्ह्याचे गांभीर्य व व्याप्ती लक्षात घेऊन पोलिस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या आदेशान्वये विशेष तपास पथक स्थापन करण्यात आले असून तपासासाठी बिहारला दोन पथके, हरयाणाला एक पथक आणि दिल्लीला एक पथक रवाना करण्यात आले असल्याचेही त्यांनी सांगितले. ■

पुढील उपाययोजना

- फेरपरीक्षा पारदर्शक पद्धतीने, शस्तिबद्ध वातावरणात पार पाडण्यात येईल.
- टीईटी-२०२६ च्या फेरपरीक्षेसाठी उमेदवारांकडून कोणत्याही प्रकारचे परीक्षा शुल्क आकारण्यात येणार नाही.
- पुढील वर्षापासून सर्व परीक्षा पूर्णतः पारदर्शक व शिस्तबद्ध वातावरणात ऑनलाईन पद्धतीने पार पाडण्यासाठी आवश्यक पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात येईल. ■

परस्परविरोधी दाव्यांनी वाढवली अनिश्चितता

इराण नरमला, भेटीची विनंती : ट्रम्प | कोणतीही भेट निश्चित नाही : इराण

दुबई, २९ जून

इराण नरमला असून, या देशाने अमेरिकेच्या प्रतिनिधींशी भेटीची विनंती केली होती, असा दावा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सोमवारी 'ट्रूथ सोशल' या समाज माध्यमावर सोमवारी केला. आठवड्याच्या शेवटी पर्शियन आखातात झालेल्या हल्ल्यांमुळे युद्ध संपवण्याच्या वाटाघाटींसमोर आव्हाने निर्माण झाली असताना, त्यानंतर कोणत्याही पुढील चर्चेचे नियोजन करण्यात आलेले नाही, असे इराणच्या एका वरिष्ठ वार्ताकाराने स्पष्ट केले. दोन्ही देशांच्या परस्परविरोधी दाव्यांमुळे पश्चिम आशियात अनिश्चितता वाढली आहे.

होर्मुझमध्ये अत्यंत स्फोटक परिस्थिती निर्माण झाली असताना डोनाल्ड ट्रम्प यांनी शांतता करार जपण्याचा प्रयत्न केला आहे. कतारमधील दोहा येथे इराणसोबत मंगळवारी बैठक होईल, असे ट्रम्प यांनी सांगितले. मात्र, अशा कोणत्याही चर्चेचे नियोजन नसल्याचे इराणचे वरिष्ठ वार्ताकार काझेम घरीबाबादी यांनी सांगितले.

या महिन्याच्या सुरुवातीला अमेरिका आणि इराण यांच्यात एक करार झाला आहे. या करारानुसार इराणला समृद्ध युरेनियमचा साठा कमी करावा लागेल आणि अमेरिकेने लादलेले निर्बंध शिथिल केले जातील. यामुळे होर्मुझची सामुद्रधुनीही खुली होईल तसेच दोन्ही बाजूंना अधिक व्यापक कराराला अंतिम रूप देण्यासाठी ६० दिवसांचा कालावधी मिळेल.

अंतरिम करारावर स्वाक्षरी झाल्यानंतर तेलाच्या किमतीत मोठी घसरण झाली; परंतु जर या किमतीत लक्षणीय वाढ झाली, तर नोव्हेंबरमधील निवडणुकांपूर्वी महागाई कमी होत असल्याचा ट्रम्प यांचा मतदारांसमोरील दावा कमकुवत ठरू शकतो.

◂ (वृत्तसंस्था



अरुणाचल प्रदेशातील केयी पॅन्योर जिल्ह्यातील नीपको कॉलनीला सोमवारी आलेल्या विनाशकारी पुराचा फटका बसला.अचानक आलेल्या पुरामुळे कारची अशी अवस्था झाली. या आपत्तीत तीन जणांचा मृत्यू झाला, तर दोघे बेपत्ता आहेत

मणिपूरमध्ये सहा बंडखोरांना अटक

इम्फाळ, २९ जून

मणिपूरमधील सुरक्षा दलांनी एका संयुक्त कारवाईत सहा बंडखोरांना अटक केली आहे. लष्कर, आसाम रायफल्स, मणिपूर पोलिस आणि केंद्रीय दलांनी कांगपोकपीसह पाच जिल्ह्यांमध्ये ही कारवाई केली.

या कारवाईदरम्यान मोठ्या प्रमाणात शस्त्रे, दारूगोळा आणि स्फोटके जप्त करण्यात आली. मणिपूरमधील दहशतवादी कारवायांविरुद्ध गत आठवड्याभरात सुरू असलेल्या मोठ्या संयुक्त कारवाईत सुरक्षा दलांना मोठे यश मिळाले आहे. ◂ (वृत्तसंस्था

परिषदेच्या उपसभापतींची १ जुलै रोजी होणार निवड

डॉ. नीलम गोऱ्हे यांच्याच निवडीची शक्यता



मुंबई, २९ जून

महाराष्ट्र विधान परिषदेच्या नव्या उपसभापतींची निवडणूक अधिकृतपणे १ जुलै २०२६ रोजी घेण्याचे जाहीर करण्यात आले आहे. विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांनी आज (२९ जून) सभागृहात ही घोषणा केली. शिवसेना (एकनाथ शिंदे गट) पक्षाच्या ज्येष्ठ नेत्या आणि विधान परिषदेच्या माजी उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांची नुकतीच विधान परिषदेवर बिनविरोध निवड झाली आहे. सदस्य म्हणून त्या पुन्हा निवडून आल्यामुळे, या अत्यंत प्रतिष्ठेच्या घटनात्मक पदावर त्यांचीच पुन्हा वर्णी लागण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे. सभापती राम शिंदे यांनी सांगितले की, महाराष्ट्र विधान परिषद नियमावलीतील नियम ७ मधील तरतुदीनुसार, बुधवार, १ जुलै २०२६ हा दिवस उपसभापतींच्या निवडणुकीसाठी निश्चित करण्यात आला आहे. ◂ (तभा वृत्तसेवा)

मराठी भाषा सक्तीची; उल्लंघन केल्यास शाळांची मान्यता रद्द

राज्यभर विशेष तपासणी मोहीम राबविणार : शिक्षणमंत्री दादा भुसे

मुंबई २९ जून

राज्यातील कोणत्याही माध्यमाच्या शाळेने मराठी भाषा सक्तीच्या आदेशाचे पालन न केल्यास थेट शाळेची मान्यता रद्द करण्याची कारवाई केली जाईल, असा गर्भित इशारा शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी सोमवारी विधानसभेत दिला. राज्यातील प्रत्येक शाळेत मराठी भाषेची सक्ती लागू आहे की नाही, याची तपासणी करण्यासाठी विशेष मोहीम हाती घेण्यात येणार असल्याचेही त्यांनी जाहीर केले.

विधानसभेत भाजपाचे आमदार अतुल भातखळकर यांनी विचारलेल्या तारांकित प्रश्नाला उत्तर देताना मंत्री भुसे बोलत होते. केवळ मराठी विषय शिकवणे पुरेसे नाही, तर त्याची परीक्षा घेणेही सक्तीचे करणार का,



असा थेट सवाल भातखळकर यांनी उपस्थित केला. यावर मराठी भाषा शिकवणे आणि तिची परीक्षा घेणे या दोन्ही बाबी सक्तीच्याच असल्याचे भुसे यांनी स्पष्ट केले.

चर्चेदरम्यान सदस्यांनी सरकारला धारेवर धरले. आतापर्यंत किती शाळांवर कारवाई झाली, सध्याची एक लाख रुपये दंडाची रक्कम वाढवून १० लाख रुपये करणार का, यासह अनेक उपप्रश्नांची सरबत्ती नितीन राऊत, सुनील प्रभू, वरुण सरदेसाई यांनी केली.

मराठी भाषा सक्तीचा मूळ शासन निर्णय (जीआर) सन २०२० मध्ये जारी करण्यात आला होता, असे मंत्री भुसे यांनी सभागृहाला सांगितले. मात्र अंमलबजावणीतील त्रुटी लक्षात घेऊन चालू वर्षीच एक नवा, अधिक कठोर जीआर काढण्यात आला आहे. त्यानुसार, मराठी सक्तीचे पालन न करणाऱ्या शाळेला प्रथम एक लाख रुपये दंड ठोठावला जाईल. त्यानंतरही शाळेने सुधारणा न केल्यास संबंधित शाळेची मान्यताच रद्द करण्यात येईल. ◂ (तभा वृत्तसेवा)

पहिली ते दहावी मराठी भाषा सक्तीची



इयत्ता पहिली ते दहावीपर्यंत मराठी भाषा सक्तीची असून, तिची परीक्षाही प्रत्येक शाळेने घेणे बंधनकारक आहे. याची प्रत्यक्ष पडताळणी शाळा भेटींद्वारे केली जाईल आणि संबंधित शिक्षण विभागाकडून त्याचा अहवाल मागवला जाईल. या तपासणीत नियमांचे उल्लंघन आढळलेल्या शाळांवर दंड आणि मान्यता रद्द करण्याची दुहेरी कारवाई करण्यात येईल, असे मंत्री भुसे यांनी सभागृहात सांगितले. ■

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

मंगळवार, ३० जून २०२६

पहिल्याच मुसळधार पावसात सोलापूर जलमय



सोलापूर, दि. २९ जून-

आर्द्रा नक्षत्रातील पहिल्याच मुसळधार पावसाने काल सोलापूर शहराची दाणादाण उडवली. अवघ्या काही तासांच्या पावसात शहरातील अनेक सखल भाग जलमय झाले, तर अनेक घरांमध्ये पाणी शिरल्याने नागरिकांना रात्रभर जागून पाणी उपसावे लागले. रस्त्यांवर गुडघाभर पाणी साचल्याने दुचाकी, रिक्षा आणि विशेषतः इलेक्ट्रिक वाहने बंद पडली. दरवर्षी पावसाळ्यात उद्भवणाऱ्या या समस्येमुळे महापालिकेच्या पावसाळापूर्व तयारीवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

नवीपेठ, मधला मारुती, छत्रपती शिवाजी महाराज चौक, दक्षिण कसबा, बाळीवेस, अक्कलकोट रस्ता, म ल्लिकार्जुन नगर, आमराई, सैफूल चौक, पोटफाडी, भागवत टॉकीज, काळी मशीद परिसर आदी भागांत गुडघाभर पाणी साचले होते. महेश कॉलनी, सम्राट चौक आणि बारामोरी परिसराला तर अक्षरशः नदीचे स्वरूप आले होते. पाथरूट चौकपोटफाडी चौक, पद्मशाली चौक, कोंतम चौक, कन्ना चौक, कुंभार वेसभवानी पेठ तसेच आसरा चौककिनारा हॉटेल मार्गावर मोठ्या प्रमाणात पाणी वाहत असल्याने अनेक वाहने बंद पडली. गणेश शॉपिंग सेंटर परिसर आणि साखर पेठ विहिरीपर्यंतचा रस्ता काही काळ वाहतुकीसाठी बंदच झाला होता. थोबडे वस्ती, साठे वस्ती, आमराई, गवळी वस्ती, वज्रेश्वरी नगर तसेच दोन नंबर झोपडपट्टी, बहुरूपी नगर आदी भागांमध्ये ड्रेनेज तुंबल्याने घरांत पाणी शिरले. अनेक कुटुंबांना रात्रभर पाणी बाहेर काढण्यासाठी धावपळ करावी लागली. ही दरवर्षीचीच समस्या असून कायमस्वरूपी उपाययोजना व्हावी,अशी मागणी नागरिकांनी केली.

महापालिकेच्या पावसाळापूर्व नियोजनावर नागरिकांनी नाराजी

नवीपेठ, बाळीवेस, दक्षिण कसबा, आमराई, सम्राट चौक, बारामोरीसह अनेक भागांत गुडघाभर पाणी साचले. थोबडे वस्ती, साठे वस्ती, गवळी वस्ती, वज्रेश्वरी नगर आदी भागांतील नागरिकांना रात्रभर पाणी उपसावे लागले. अनेक मार्गांवर पाण्याचा वेग वाढल्याने दुचाकी, रिक्षा आणि चारचाकी वाहने बंद पडली. पहिल्याच पावसात शहर जलमय झाल्याने म हापालिकेच्या पावसाळापूर्व नियोजनावर नागरिकांनी नाराजी व्यक्त केली.

राष्ट्रीय योंगमुडो पंच परीक्षेत सोलापूरच्या रुद्रशक्ती गुरुकुलच्या सहा विद्यार्थिनींचे यश

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २९ जून-



ग्रीन पॅराडाईज रिसॉर्ट येथे २७ व २८ जून रोजी राष्ट्रीय योंगमुडो पंच परीक्षा घेण्यात आली. या परीक्षेत रुद्रशक्ती गुरुकुलच्या सहा विद्यार्थिनींनी नेत्रदीपक यश संपादन करत राष्ट्रीय पंच म्हणून पात्रता मिळवली आहे.

रुद्रशक्ती गुरुकुलचे मुख्य प्रशिक्षक विवेक मिस्कीन यांच्या मार्गदर्शनाखाली या विद्यार्थिनींनी परीक्षेची तयारी केली होती. राष्ट्रीय स्तरावरील या परीक्षेत उत्तीर्ण होऊन त्यांनी आपल्या क्रीडा कौशल्याची मोहोर उमटवली. या पंच परीक्षेत सोनाक्षी माडे, श्रद्धा सरवदे, अदिती नल्ला, बिंदूप्रिया कुने, जानवी म्हेत्रे आणि गौरी माळी या विद्यार्थिनी यशस्वी झाल्या.

या सर्व यशस्वी विद्यार्थिनींचे योंगमुडो असोसिएशन इंडियाचे अध्यक्ष मास्टर रोहित नारकर, योंगमुडो असोसिएशन महाराष्ट्रचे सचिव नागेश शेट्टीकर आणि रुद्रशक्ती गुरुकुलचे संस्थापक अध्यक्ष योगीनाथ फुलारी यांनी कौतुक करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.



बी. नारायणा फाऊंडेशनतर्फे गरजू विद्यार्थ्यांना मोफत वही व पाट्यांचे वाटप

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २९ जून-

बी. नारायणा फाऊंडेशनतर्फे गरजू व होतकरू विद्यार्थ्यांसाठी मोफत वही वाटप कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. यावेळी प्राथमिक शालेय विद्यार्थ्यांना पाट्यांचेही वितरण करण्यात आले. या उपक्रमाचा लाभ जवळपास २०० विद्यार्थी-विद्यार्थिनींनी घेतला.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून सुनिल जाधव उपस्थित होते. अध्यक्षस्थानी विनायक बटगिरी होते. संस्थेचे अध्यक्ष शंकर बटगिरी यांनी प्रास्ताविकातून फाऊंडेशनच्या शैक्षणिक व सामाजिक उपक्रम ांची माहिती देत, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी संस्था सातत्याने कार्यरत राहील, असा विश्वास व्यक्त केला.

यावेळी श्रीमद् वीरशैव कुरुहिनशेट्टी ज्ञाती संस्थेचे विश्वस्त नागेश टंकसाल, संस्थेचे माजी सचिव सत्यनारायण द्यावरकोंडा, नीलकंठेश्वर प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका शाम ला गवनी, रेश्मा बोगा, शिल्पा अलमेलकर, श्रीनिवास बंदगी, नरसिंग म्हंता, रमेश म्हंताटी, शशिकांत नादरगी, समर्थ बुगडी, नितेश पोगुल, राहुल गड्डम, लक्ष्मीकांत आडकी, राजू माचर्ला, प्रसाद माचर्ला, कार्तिक चिकनी, राजू आवाल, अंबादास दंडगळ, नवल बटगिरी, समर्थ मुटकिरी, रमेश कनकी, नविन गंजी यांच्यासह अनेक मान्यवर व पालक उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शंकर बटगिरी यांनी केले. निखिल बटगिरी यांनी उपस्थितांचे आभार मानले.

जाहीर प्रसिध्दीकरण

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०, नियम १९६१ व महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम २०१४ मधील तरतूदीनुसार, खालील ''क'' वर्गातील सहकारी संस्थेच्या सन २०२६-२७ ते सन २०३१-३२ साठी संचालक मंडळाच्या निवडणूक करीता तात्पुर्ती मतदार यादी कार्यक्रमाचे जाहीर प्रसिध्दीकरण करण्यात येत आहे.

अ. क्र.	सहकारी संस्थेचे नांव
१	जिजाऊ महिला अर्बन को. ऑप.क्रेडिट सोसायटी लि. मेडशिंगी (हस्तलिखित)
२	गोकुळ अर्बन को. ऑप.क्रेडिट सोसायटी लि. सांगोला
३	ओम साई महिला अर्बन को. ऑप.क्रेडिट सोसायटी लि. सांगोला
४	मेट्रिक्स ग्लोबल अर्बन को. ऑप.क्रेडिट सोसायटी लि. सांगोला
५	श्री स्वामी समर्थ महिला अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लि. सांगोला
६	विद्यामंदिर सेवक सहकारी पतसंस्था मर्या.नाझरे

-: क वर्ग संस्था प्रारुप मतदार यादी प्रसिध्दी कार्यक्रम :-

अ. क्र.	तपशिल	तारीख
१	निवडणूक नियम ६ (३) नुसार तात्पुरती मतदार यादी प्रसिध्द करण्याची तारीख	दि.३०/०६/२०२६
२	निवडणूक नियम ८ (१) नुसार तात्पुरत्या मतदार यादीवर आक्षेप अगर दावे तालुका सहकारी निवडणूक अधिकारी सोलापूर यांचेकडे सादर करावयाची तारीख	दि.३०/०६/२०२६ ते दि.०६/०७/२०२६
३	प्रारुप मतदार यादीवर आक्षेप अगर दावे प्राप्त न झाल्यास निवडणूक नियम ८ (३) नुसार अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करावयाची तारीख	दि.०७/०७/२०२६
४	निवडणूक नियम ८ (३) नुसार आक्षेप अगर दावे यावर तालुका सहकारी निवडणूक अधिकारी सोलापूर यांनी द्यावयाचा निर्णयाची तारीख	दि.१३/०७/२०२६
५	प्रारुप मतदार यादीवर आक्षेप अगर दावे प्राप्त झाल्यास निवडणूक नियम ८ (३) नुसार अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करावयाची तारीख	दि.१३/०७/२०२६

उपरोक्त कार्यक्रम तालुका सहकारी निवडणूक अधिकारी, तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, सांगोला यांचा पत्ता :- क्षत्रिय माळी वि.का.से.इमारत १ ला मजला,कचेरी रोड ,सांगोला.ता. सांगोला जि .सोलापूर येथे व संबंधित संस्थेच्या कार्यालयाचे नोटीस बोर्डावर रितसर प्रसिद्ध करण्यात आलेला आहे याची नोंद घ्यावी.

सही/-
(डॉ.वैशाली साळुंखे)
तालुका सहकारी निवडणूक अधिकारी
तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, सांगोला

सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

इंद्रभुवन, आंबेडकर चौक, रेल्वे लाईन्स, सोलापूर-४१३००१
नगर अभियंता कार्यालय - रस्ते विभाग
ई-मेल : aeslumtechnical@gmail.com

जा.क्र.नगर अभियंता/गवसू (तांत्रिक)/२०२६-२७ दि. २९/०६/२०२६

जाहीर प्रसिध्दीकरण
ई-निविदा सूचना क्रमांक १

सोलापूर महानगरपालिका नगर अभियंता (ग.व.सु) मुख्य कार्यालयाकडील लोकशाहीर आण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजना सन २०२५-२६ अंतर्गत ०६ रस्ते करणे (ग.व.सु. तांत्रिक विभाग) या विकास कामाचे निविदा प्रसिध्द करण्यात आले आहे.

Tender ID 2026_SMC_1311340_1

या कामाचे टेंडर शासनाच्या https://mahatenders.gov.in या वेबसाईटवर दिनांक २५/०६/२०२६ रोजी सकाळी १०.०० पासून पाहण्यास उपलब्ध आहे.

सही/- **नगर अभियंता**
सोलापूर महानगरपलिका, सोलापूर

HEALTH DEPARTMENT - GOVERNMENT OF MAHARASHTRA

TENDER NOTICE 2026-27
CIVIL SURGEON SOLAPUR

Rate Contract for supply of Medicine, Consumables & Lab Materials
Tender Reference No. DHS/Office/Medicine, Cons, Lab Mat & Instrument/Tender-01/26-27
E-Tender for Ashadhi Wari Event Management
Tender Reference No. DHS/ASHADI WARI EVENT MANAGEMENT/ E Tender No. 2/2026-27

Civil Surgeon, Solapur invites proposals from reputed and experienced companies, Recognized Manufacturers / Sole Distributors and supplier to participate in the competitive bidding process to Purchase of Medicine, Consumables, Lab Material, Ashadhi Wari Event Management, Prachar Prasidhi Material & Maha Arogya shibir Event Management. For the detailed tender documents, interested bidders should visit **http://www.maharashtra.gov.in/tenders**

Tender submission would be online and the deadline to submit the proposals is 06/07/2026 (17.00 PM)

Civil Surgeon Solapur

Aryan Creation

खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः बार्शी शहर व तालुका बार्शी येथील व आसपासचे परिसरातील लोकांना कळविण्यात येते की, डि. सोलापूर व सब डि. व ता. बार्शी पैकी शहर बार्शी म्यु. पल हद्दीतील नियोजित समर्थ गृहनिर्माण सहकारी संस्था मर्या. बार्शीमधील असून याचा ग.नं. ९३४/२ यापैकी प्लॉट नं. १९ याचे क्षेत्रफळ २००० चौ. फुट याचे चौ.मी. १८५ आहे. याची चतुःसीमा- पूर्वेस- रस्ता, दक्षिणेस- जोशी यांची जागा, पश्चिमेस - ग.नं. ९३४ पैकी पाटील/सावंत यांची जागा व उत्तरेस- दुगम यांचा प्लॉट याचे पाणी व वागणूक पूर्वबाजूचे रस्त्याने जाते व आहे. येणेप्रमाणे मिळकत आतील तदंगभुत वस्तु मिळकत.

वर नमूद केलेली मिळकत ही सौ.मालती मुकुंद प्रतापे रा. उपळाई रोड, देशमुख प्लॉट, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर यांचे मालकी कब्जे वहिवाटीची व ७/१२ हक्कपत्रकी नोंद असलेली मिळकत असून त्यांनी त्यांचे कायदेशीर गरजेपोटी ती विक्रीस काढून आमचे खरेदीदार अशिलास ती कायम खुषखरेदी देण्याचा ठराव करून इसाराची रक्कम स्विकारलेली आहे. सदर मिळकत ही निर्वेध, निजोखमी व बोजारहीत असलेचा भरोसा व निर्वाळा विद्यमान मालकांनी आमचे अशिलास दिलेला आहे. तरी या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, वर नमूद मिळकती संबंधाने कोणाचे काही हक्क, अधिकार, तक्रारी, करार मदार, कोर्ट मॅटर वा अन्य कोणत्याही स्वरुपाचा हक्क, अधिकार व्यवहार वा दस्त असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ०८ दिवसात आमचे खालील पत्त्यावर संपर्क करून आमची कागदोपत्री पुराव्यानिशी खातरजमा करून द्यावी. अन्यथा कोणाचेही कसलेही हक्क अधिकार नाहीत आणि असतील तर त्यांनी सोडून दिले असे आमचे अशिल गृहीत धरून पुढील व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही. कोणाचीही फसगत होवू नये म्हणून ही जाहीर नोटीस प्रसिद्ध केली असे.

ता.३०/०६/२०२६.

सही/-
अशिलातर्फे ॲडव्होकेट
ॲड. अनिरुध्द एस.उत्पात
अति.जिल्हा व सत्र न्यायालय.बार्शी,
बार्शी, जि. सोलापूर.
मो.नं. ७२७६५३८७५८

खरेदीपूर्व जाहीर नोटीस

शहर सोलापूर येथील तमाम जनतेस विशेषतः शहर सोलापूर येथील जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन : डिस्ट्रिक्ट व सब डिस्ट्रिक्ट सोलापूर पैकी उत्तर सोलापूर पैकी सोलापूर महानगरपालिका हद्दीतील सिध्देश्वर पेठ येथील म्यु.पल घर नं. १०५ याचे सि.स.नं. ६०९५/५५ याचे एकूण क्षेत्र ५२४.२ चौ.मी. यावरील सनराईज हाईटस या इमारती मधील दुकान नं. १०, तळ मजला याचे कारपेट क्षेत्र १३.९० चौ.मी. वि.क्र.१३/३९ दर प्र.चौ.मी. ५१.०८० असे आहे. येणे प्रमाणे मिळकती जागा मुमताज हारून मंगलगिरी - रा. शनिवार पेठ, सोलापूर यांचे मालकी कब्जे वहिवाटीचे होती व आहे. वरील नमूद मिळकत ही निर्वेध निजोखमी असल्याने व तसेच सदर वर नमूद मिळकतीचे मालकांनी तसा विश्वास दाखविल्याने आमचे अशील यांनी वरील मिळकत सिध्देश्वर पेठ सोलापूर हि मिळकत खरेदी घेण्याचे ठरविलेले आहे सदरील मिळकतीवर इतर कोणाचीही, कसल्याही प्रकारचे हक्क, हितसंबंध, गहाण, दान, लिज, लीन, टाच, पोटगी, कोर्ट प्रकरण व इतर कायदेशीर हक्क असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत खालील नमूद पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी आपली हरकत नोंदवावी, त्यानंतर कोणाचीही, कसलीही प्रकारची तक्रार अथवा हरकत चालणार नाही, कोणाची फसवणूक, गैरसोय, नुकसान होऊ नये म्हणून ही जाहीर नोटीस प्रसिद्ध केली असे दिनांक २९/०६/२०२६.

सही/-
अशिलातर्फे ॲडव्होकेट
ॲड. धनश्री बी. केंढळे,
बी.एसी., एलएल.बी.,
१३०, सिध्देश्वर पेठ, कोर्ट लाईन,
गितांजली झेरॉक्स सेंटर, सोलापूर
मो.नं. ८६००३०४४३३

खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः शहर बार्शी, ता. बार्शी व आसपासचे लोकांना आमचे आशिल यांचे तर्फे त्यांनी माहिती दिलेवरून व नोटीस देण्यास सांगितलेवरून या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

डि. सोलापूर सब. डि. ता. बार्शी पैकी शहर बार्शी येथील सि.स.नं. ७१०/१९ याचे एकूण क्षेत्रफळ ३०३.०० चौ.मी. ; यापैकी यातील लिहून देणार यांचे खरेदी मालकी व प्रत्यक्ष कब्जेवहिवाटीची पश्चिम बाजूची संपूर्ण जागा याचे क्षेत्रफळ ५३.७४ चौ.मी. याचे मोजमाप प्रत्यक्ष जागेवरती आहे. सदर मिळकतीमधील बांधकामाचा तपशिल - खण रजिस्टर नुसार ३२५ चौ.फुट म्हणजेच ३०.२० चौ.मी. एवढे अ-२ प्रकारचे पक्क्या स्वरूपाचे आर.सी.सी. फ्रेम स्ट्रक्चर असलेले विटा, दगड, सिमेंट मधील बांधकाम आहे, त्या बांधकामातील सर्व खोल्या, विटा, सिमेंट दरवाजे, खिडक्या, संडास बाथरूम, लाईट कनेक्शन फिटींगसह. सदर मिळकतीचे सर्व बाजूच्या भिंती या लिहून देणार यांच्या स्वतंत्र मालकी व कब्जेवहिवाटीच्या आहेत. यांसी चतुःसिमा :- पूर्वेस - सदर नंबरपैकी सोमनाथ नागनाथ फुले यांचे मालकीची जागा, दक्षिणेस - ४.५७ मी. रूंदीचा रस्ता, पश्चिमेस - गट नं. ९२८/१ पैकी १.५ मी. रूंदीचा सोडलेला बोळाचा रस्ता व उत्तरेस - कमलाकांत शिंदे यांचे मालकीची जागा व गट नं. ९२८/१ याचे क्षेत्र आहे. याचे पाणी व वागणुक ही दक्षिण व पश्चिम बाजूचे रस्त्याने जाते व आहे. येणेप्रमाणे चतुःसिमापूर्वक प्लॉटजागा मिळकत आतील सर्व तदंगभूत वस्तू व वहिवाटीचे हक्कासह,

वर नमूद बांधकामासहीत प्लॉट जागा मिळकत ही क्रांती मधुकर झोंबाडे यांचे खरेदी मालकी व कब्जेवहिवाटीची असून मालमत्ता पत्रकी त्यांचे नावे दाखल आहे. सदर बांधकामासहीत प्लॉट जागा मिळकत ही क्रांती मधुकर झोंबाडे यांनी आमचे अशिलास खरेदी देण्याचा ठराव केलेला आहे व आमचे अशिलाकडून इसारा दाखल रक्कम स्विकारलेली आहे. सदर प्लॉट जागा मालकाने सदरची मिळकत ही निर्वेध व निजोखमी असल्याची खात्री व भरोसा आमचे अशिलास दिलेला आहे. या उपरही वर नमूद प्लॉट जागा मिळकतीशी इतर कोणाचीही खरेदी, साठेखत, गहाण, दान, लिज, बोजा इजमेंटरी राईट इत्यादी कोणत्याही प्रकारचा कसलाही हक्क, अधिकार, हिस्सा व हित संबंध असल्यास प्रस्तुत नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ (सात) दिवसाचे आत संबंधितांनी खालील नमूद पत्त्यावर संपर्क साधून त्याबाबत कागदपत्रानिशी शहानिशा करून द्यावी अथवा तक्रार वा हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही तक्रार वा हरकत न आलेस आमचे आशिल कोणाची काहीही हरकत अथवा तक्रार नाही असे समजून वरील प्लॉट जागा मिळकतीबाबत ठरावाप्रमाणे वर नमूद प्लॉट जागा मालकाशी खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. तद्नंतर कोणाचीही कोणत्याही व कसल्याही प्रकारची तक्रार वा हरकत चालणार नाही याची नोंद घ्यावी. कोणाचीही फसगत होवू नये म्हणून प्रस्तुत जाहीर नोटीस दिली.

ता. २९/०६/२०२६.

सही/-
ॲड. महंमद ए. लांडगे
ऑफीस- महेदी नगर, बार्शी, ता. बार्शी,
जि. सोलापूर मो. नं. ८४४६४६१६६२

सही/-
अशिल

Change in Name

I hereby declare that my old Name **BEGAM PASHAMULANI** has Bee changed to New Name **BEGAM MOTILAL SHAIKH** and residing at A/p. Khadakpura Galli Vairag Tal. barshi,Dist. Solapur kindly note the same.

Affi No:
26526424612685010599 62
Date:29/06/2026

IDFC FIRST Bank Limited

IDFC FIRST Bank

(erstwhile Capital First Limited, amalgamated with IDFC Bank Limited and presently known as IDFC First Bank Limited) | CIN : L65110TN2014PLC097792
Registered Office: - KRM Towers, 8th Floor, Harrington Road, Chetpet, Chennai- 600031.
Tel : +91 44 4564 4000 | Fax: +91 44 4564 4022

वित्तीय मालमत्तेचे सुरक्षा आणि पुनर्बांधणी आणि सुरक्षा व्याज कायदा, २००२ च्या कलम १३ (२) अंतर्गत सूचना

खालील कर्जदार आणि सह-कर्जदारांनी **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झालेली आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाणारी) कडून खाली नमूद केलेली सुरक्षित कर्जे घेतली. खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि सह-कर्जदारांची कर्जे त्यांच्या संबंधित मालमत्तेच्या गहाणखताने सुरक्षित करण्यात आली आहेत. त्यांनी संबंधित कर्ज करारांच्या अटी आणि शर्तींचे पालन करण्यात अयशस्वी झाल्यामुळे आणि अनियमित झाल्यामुळे, त्यांचे कर्ज आरबीआयच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार एनपीए म्हणून वर्गीकृत करण्यात आले. **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झालेली आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाणारी) यांना देय असलेल्या रकमा खालील तक्त्यात अधिक स्पष्टपणे वर्णन केलेल्या संबंधित सूचनांनुसार नमूद केल्या आहेत आणि त्या रकमेवरील पुढील व्याज देखील लागू असेल आणि त्यांच्या संबंधित तारखांपासून कराराच्या दरानुसार आकारले जाईल.

अं. क्र.	कर्ज खाते क्र.	कर्जाचा प्रकार	कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे	कलम १३ (२) सूचना दिनांक	कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकीची रक्कम
1	161790261	मालमत्तेवर कर्ज	१. पोपट नामदेव चव्हाण २. मंगल नामदेव चव्हाण	10/06/2026	INR 10,60,443.44/-

मालमत्तेचा पत्ता: ग्रामपंचायत मिळकत नं. ४७० असलेली निवासी घराची संपूर्ण जागा व वास्तू, ज्याचे क्षेत्रफळ १०८० चौ. फूट (३०*३६) आहे आणि ३९२० चौ. फूट (५६*७०) क्षेत्रफळ असलेली खुली जागा, ठिकाण- गाव: आनंदनगर, तालुका: माळशिरस, जिल्हा: सोलापूर. चतु:सीमा - पूर्व: तुकाराम सदाशिव चव्हाण, पश्चिम: महादेव अप्पा मडाणे, उत्तर: अकलूज चाकोरे रोड, दक्षिण: अंकुश अण्णा डांगट.

या प्रकाशनाच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत तुम्हाला वरील तक्त्यात दाखवलेल्या तपशीलांनुसार **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झालेली आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाणारी) कडे रक्कम त्यांच्या संबंधित तारखांपासून आणि इतर खर्च, शुल्क इत्यादींपासून करारबद्ध व्याजदरासह भरण्याचे आवाहन करण्यात येत आहे. असे न केल्यास, खाली स्वाक्षरी करणाऱ्या व्यक्तीला आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) कडे देय रक्कम वसूल करण्यासाठी वर नमूद केलेल्या गहाण ठेवलेल्या मालमत्तेविरुद्ध कलम १३ (४) आणि कलम १४ अंतर्गत, **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** (पूर्वीची **कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झालेली आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाणारी) देय रक्कम वसूल करण्यासाठी कार्यवाही सुरू करण्यास अधीन असेल. शिवाय, तुम्हाला सदर कायद्याच्या कलम १३ (१३) अंतर्गत सदर सुरक्षित मालमत्ता विक्री/भाडेपट्टा किंवा इतर प्रकारे हस्तांतरित करण्यास मनाई आहे.

सही/- अधिकृत अधिकारी
आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीचे कॅपिटल फर्स्ट लिमिटेड,
आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये एकत्र केलेले
आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँकलिमिटेडम्हणून ओळखले जाते)

दिनांक : 30/06/2026
स्थळ : सोलापूर, महाराष्ट्र

अुत्तम सेवा — मंगळवार दि. ३० जून २०२६ — नोकरीच्या शोधात

उमेदवारांसाठी अत्यंत महत्त्वाची सूचना- खालील विविध स्पर्धा परीक्षांचे फॉर्म योग्य त्या विहीत नमुन्यात नसल्यास रद्द होऊ शकतात. तरी हे टाळण्यासाठी नोकरीविषयक स्पर्धा परीक्षा फॉर्म विक्रीचे सोलापुरातील एकमेव, अचूक फॉर्म विक्री केंद्र, अुत्तम सेवा, पार्क चौक, सोलापूर येथूनच फॉर्म खरेदी करावेत व संभाव्य नुकसान टाळावे.

अ. क्र.	ज्या कार्यालयात पद आहे त्या कार्यालयाचे नाव	शैक्षणिक/तांत्रिक अर्हता पदनाम व अनुभव	वयोमर्यादा (वर्षात)	अर्ज भरण्याची अंतिम तारीख
१)	**महाराष्ट्र लोकसेवा आयोग, MPSC**			
१	लिपीक (१८६४ पदे)	पदवी व मराठी / इंग्रजी टायपिंग उत्तीर्ण स्त्री/पुरुष उमेदवार असावे	३८ पर्यंत	१७/०७/२६
२	सहा. मोटार वाहन निरीक्षक गट - क (४६१ पदे)	पदवी / पदविका अभियांत्रिकी (ऑटो/मेकॅ) उत्तीर्ण स्त्री/पुरुष उमेदवार	३८ पर्यंत	
३	कर सहाय्यक (२८२ पदे)	पदवी व मराठी व इंग्रजी टायपिंग	३८ पर्यंत	
४	तांत्रिक सहाय्यक (०३ पदे)	पदवीधर स्त्री/पुरुष उमेदवार असावे	३८ पर्यंत	
५	उद्योग निरीक्षक (०९ पदे)	पदवी / पदविका (स्थापत्य) किंवा B.Sc. उत्तीर्ण	३८ पर्यंत	
२)	**सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक**			
१	लिपीक (४४४ पदे)	पदवी व MS-CIT उत्तीर्ण असावे	३५ पर्यंत	०८/०७/२६

*** मोफत सरकारी अपडेट ***
सर्व सरकारी नोकरींचे व स्पर्धा परिक्षांचे अपडेट आपल्या व्हॉटस्ॲपवर मोफत मिळविण्याकरिता ९७६३७४१९९१ या नंबरला ''जॉईन'' असा मेसेज व्हॉटस्ॲप करावा.

३)	**स्टेट बँक ऑफ इंडिया, SBI**			
१	प्रोबेशनरी ऑफिसर (१५०० पदे)	पदवीधर स्त्री/पुरुष उमेदवार असावे	३० पर्यंत	०८/०७/२६
४)	**भारत संचार निगम लि.**			
१	ज्यु. टेलिकॉम ऑफिसर (१०० पदे)	B.E. (इलेक्ट्रॉ/कॉम्प्यु/इले./आय.टी./ टेली/रेडीओ) उत्तीर्ण असावे	३० पर्यंत	०३/०७/२६
५)	**भारतीय वायु सेना, IAF**			
१	अग्निवीरवायु	बारावी (५०%) गणित विषयासह किंवा डिप्लोमा (मेकॅ/इले/इलेक्ट्रॉ/ ऑटो/कॉम्प्यु/आय.टी) उत्तीर्ण असावे.	२१ पर्यंत	२६/०७/२६

सुवर्णसंधी - १) वार्षिक वर्गणी भरल्यास वर्षभर नोकरीविषयक फॉर्म घरपोच मिळतील.
२) नोकरीविषयक फॉर्म संबंधित कार्यालयास सत्वर पोहोच केले जातील. (कुरिअर सर्व्हिस)
३) खाजगी नोकरी (प्रायव्हेट प्लेसमेंट)साठी नाव नोंदणी करा. ४) नोकरीविषयक साप्ताहिकाचे सभासद व्हा.

वरीलपैकी कोणत्याही फॉर्मसाठी वा अचूक माहितीसाठी भेटा वा रु. ५०/- ची मनिऑर्डर करा. MPSC, RRB, BSRB, SET, NET, IAS / IPS, NDA, CDS, LIC, KVS नवोदय, कोर्ट, निवड मंडळ, स्टाफ सिलेक्शन, इंजिनिअरिंग, पोलीस भरती, तलाठी, रेल्वे या स्पर्धा परीक्षांची अद्ययावत पुस्तके फक्त आमच्याकडेच मिळतील.

वरीलपैकी कोणत्याही फॉर्मसाठी वा अचूक माहितीसाठी भेटा वा रु. ५०/- ची मनिऑर्डर करा. MPSC, RRB, BSRB, SET, NET, IAS / IPS, NDA, CDS, LIC, KVS नवोदय, कोर्ट, निवड मंडळ, स्टाफ सिलेक्शन, इंजिनिअरिंग, पोलीस भरती, तलाठी, रेल्वे या स्पर्धा परीक्षांची अद्ययावत पुस्तके फक्त आमच्याकडेच मिळतील.

अुत्तम सेवा
१) २२, डॉ. कोटणीस शॉपिंग सेंटर, सिद्धेश्वर मंदिराजवळ, पार्क चौक, सोलापूर.
वेळ स. १० ते सायं ७, फोन नंबर - ९७६३७४१९९१.
www.uttamseva.org

JANSEVA NAGARI SAHAKARI BANK MYDT. BHOOM

BALANCE SHEET AS ON 31st MARCH, 2026

Published U/s 29 & 31 of the Banking Regulation Act, 1949.

31/03/2025		LIABILITITIES	31/03/2026	
AMOUNT	AMOUNT		AMOUNT	AMOUNT
2,00,00,000.00		Authorised Share Capital		2,00,00,000.00
1,43,67,900.00		**PAID UP SHARE CAPITAL**		1,67,87,175.00
	1,43,67,900.00	Share Capital	1,67,69,175.00	
	-	Share Anamat	18,000.00	
14,81,94,052.00		FUNDS		17,57,86,515.00
	56,01,600.00	Reserve Fund	60,31,475.00	
	35,00,000.00	Building Fund	38,50,000.00	
	2,73,50,000.00	N.P.A. Provision	2,92,00,000.00	
	4,01,000.00	Standard Assets Provision	5,01,000.00	
	10,83,99,755.00	Overdue Interest Reserve	13,28,93,243.00	
	7,50,000.00	Investment Fluctuation Fund	10,00,000.00	
	10,886.00	Charity Fund	10,886.00	
	2,51,000.00	Member Welfare Fund	2,51,000.00	
	97,000.00	Investment Depreciation fund	2,00,000.00	
	7,58,711.00	Other Receivable Provision	7,58,711.00	
	100.00	Member Education Fund	200.00	
	1,00,000.00	Staff Welfare Fund	1,00,000.00	
	7,50,000.00	General Reserve	7,50,000.00	
	24,000.00	Election Fund	40,000.00	
	2,00,000.00	BDDR2024	2,00,000.00	
30,63,27,011.63		**DEPOSIT**		34,07,66,855.24
	8,96,26,117.50	Savings Deposit	10,74,56,902.36	
	53,30,108.13	Current Deposit	39,26,515.88	
	2,59,36,970.00	Pigmy Deposit	3,28,28,660.00	
	15,72,76,992.00	Fixed Deposit	16,74,36,927.00	
	2,43,47,436.00	Reinvestment Deposit	2,39,92,453.00	
	20,07,092.00	Recurring Deopsit	27,08,101.00	
	68,000.00	Security Deposit	83,000.00	
	17,34,296.00	Deposit Matured	23,34,296.00	
-		Bills Reco. For Collection		
27,30,650.94		**OTHER LIABILITITIES**		34,83,059.88
	2,02,790.96	Audit fees payable	2,78,231.96	
	-	Suspense Account	1,500.00	
	87,135.00	Interest Payable	1,39,212.00	
	1,600.00	Professional Tax Payable	1,600.00	
	23,79,000.00	Income Tax Payable	29,29,000.00	
	9,450.00	Other Payable	14,900.00	
		Surcharge	-	
	3,177.00	TDS Payable	3,658.00	
	7,531.00	TDS Payable Deposit Intt.	27,404.00	
	-	TDS Payable 194 N	-	
		Cash Withdrawal	87,553.92	
	39,966.98	GST Payable Output		
11,21,597.66		**PROFIT**		10,98,917.01
	22.39	Previous Year Profit	47.66	
	11,21,575.27	Current Profit	10,98,869.35	
47,27,41,212.23		TOTAL		53,79,22,522.13

31/03/2025		ASSETS	31/03/2026	
AMOUNT	AMOUNT		AMOUNT	AMOUNT
39,87,160.00		**CASH IN HAND**		58,73,544.00
3,67,94,340.63		**CASH AT BANK**		4,57,91,042.68
	51,47,170.77	S. B. I. Branch Bhoom 11485	54,52,480.77	
	33,986.75	S. B. I. Branch Bhoom	33,337.75	
	19,35,225.57	B. O. I. Branch Bhoom	89,37,829.57	
	66,09,751.40	I. D. B. I. Branch Bhoom	70,91,892.82	
	7,55,424.19	Dharashiv D.C.C. Bank	8,07,304.19	
	63,86,324.67	M. S. C. Bank Ltd.Mumbai	47,12,405.67	
	58,52,390.10	H.D.F.C. Bank Ltd. 2568	88,25,819.04	
	22,28,837.43	H.D.F.C. Bank Ltd. 3913	11,77,327.52	
	78,45,229.75	M. G. B. Branch Bhoom	87,52,645.35	
16,28,18,046.00		**INVESTMENTS**		16,03,27,529.00
	10,52,70,132.00	Govt. Security	10,52,70,132.00	
	65,31,122.00	S. B. I. Fixed Deposit	65,31,122.00	
	60,00,000.00	B. O. I. Fixed Deposit	60,00,000.00	
	56,82,794.00	I. D. B. I. Fixed Deposit	61,14,299.00	
	50,00,000.00	H.D.F.C. Fixed Deposit	50,00,000.00	
	45,53,280.00	M. G. B. Fixed Deposit	48,47,750.00	
	53,86,508.00	Building Fund IDBI FDR	61,30,016.00	
	23,44,656.00	Reserve Fund SBI FDR	23,44,656.00	
	67,81,554.00	Reserve Fund DCC FDR	67,81,554.00	
	2,50,000.00	M. S. C. Bank Fixed Deposit	2,50,000.00	
	1,000.00	M. S. C. Bank Shares	1,000.00	
	1,000.00	M.S. C. Bank Asso.Member	1,000.00	
	5,000.00	O'bad DCC Bank Shares	5,000.00	
	1,50,11,000.00	PSU Bonds	1,10,51,000.00	
14,90,68,820.00		**LOANS**		17,99,48,587.00
	12,20,226.00	Gayee & Mhashi Kharedi	12,20,226.00	
	17,39,762.00	Surety Loan	23,08,367.00	
	2,69,49,332.00	Term Loan	2,90,15,141.00	
	93,16,316.00	Vehical Loan	1,23,87,872.00	
	28,02,889.00	Cash Credit Loan	18,29,029.00	
	8,33,08,498.00	Small Scale Busines Loan	11,03,99,390.00	
	29,93,001.00	Gold Loan	35,77,529.00	
	10,33,940.00	Swayam Rojgar Loan	8,40,044.00	
	25,05,382.00	Salary Loan	14,89,501.00	
	59,04,163.00	Housing Loan	44,31,046.00	
	14,65,000.00	Bills Collection	14,65,000.00	
	47,53,268.00	Retail Business Loan	31,98,122.00	
	-	Retail Business Short Term Loan	15,61,506.00	
	39,45,743.00	Advances Against Deposit	56,98,114.00	
	11,31,300.00	Advances Against Pigmy	5,27,700.00	
2,89,670.06		Bills Sent For Collection		
		FIXED ASSETS		2,79,313.56
	1,05,238.18	Computer System Account	1,12,254.68	
	1,05,603.32	Dead Stok	96,135.32	
	65,138.00	Furniture Account	58,624.00	
	13,463.56	Fixtures Account	12,117.56	
	227.00	Motor Cycle	182.00	
50,91,615.12		**INTEREST RECEIVABLE**		56,15,299.12
	18,29,596.12	Intt. Rec. On Govt. Sec.	18,29,596.12	
	21,89,345.00	Intt. Rec. On Investment	30,82,470.00	
	10,72,674.00	Intt. Rec. On PSU Bonds	7,03,233.00	
11,05,14,287.00		**INTT. REC. ON LOAN**		13,50,11,912.00
	36,99,628.00	Intt.Rec.on Gayee & Mhashi	45,93,929.00	
	9,37,533.00	Intt.Rec.on Suriety Loan	6,74,852.00	
	9,20,89,747.00	Intt.Rec.on Term Loan	11,26,16,416.00	
	65,62,056.00	Intt.Rec.on Vehicle Loan	80,03,350.00	
	39,287.00	Intt.Rec.on Cash Credit	65,095.00	
	28,95,519.00	Intt.Rec.on Small Scale Bus.	43,35,868.00	
	1,28,819.00	Intt.Rec.on Gold Loan	1,70,040.00	
	17,096.00	Intt.Rec.on Swayam Rojgar	94,264.00	
	32,47,668.00	Intt.Rec.on Salary Loan	32,01,498.00	
	4,68,941.00	Intt.Rec.on Housing Loan	6,79,908.00	
	1,79,625.00	Intt.Rec.on Retail Business Loan	2,19,582.00	
	-	Intt.Rec.on Retail Business ST Loan	24,523.00	
	2,41,818.00	Intt.Rec.on FDR Advances	3,26,122.00	
	6,550.00	Intt.Rec.on Pigmy Advances	6,465.00	
41,77,273.42		**OTHER ASSETS**		50,75,294.77
	8,11,162.00	Advances	7,51,162.00	
	10,099.00	Telephone Deposit	10,099.00	
	7,450.00	M. S. E. B. Deposit	7,450.00	
	1,26,296.02	Printing & Stationary Stock	1,45,437.73	
	58,522.00	Prepaid Insurance Account	81,447.00	
	11,400.00	Govt. Security Premium	5,700.00	
	29,65,659.00	Advance Income Tax	35,94,247.00	
	1,77,089.00	Income Tax Receivable	1,77,089.00	
		Election Advances	2,90,000.00	
	769.00	DEAF Claim Receivable From RBI	2,244.00	
	8,827.40	GST Receivable Input	10,419.04	
		LOSS		
		Previous Year Profit		
		Current Loss		
47,27,41,212.23		TOTAL		53,79,22,522.13

PROFIT & LOSS ACCOUNT AS ON 31st March, 2026

31/03/2025	EXPENDITURE	31/03/2026
AMOUNT		AMOUNT
1,50,34,239.00	Interest Paid on Deposit	1,65,91,832.00
-	Interest Paid on PSU Bonds	-
26,92,200.00	Salary	28,78,300.00
2,21,944.00	Bonus	2,69,220.00
-	Ex Gratia Payment	-
3,000.00	Director Meeting Sitting Fees	6,000.00
1,40,000.00	Audit Fees	1,50,000.00
32,700.00	Internal / Concurrent Audit Fee	40,000.00
27,300.00	Tax Audit Fees	27,300.00
23,980.00	VAPT Audit /System / EDP Audit Fees	54,500.00
1,68,000.00	Office Rent	1,68,000.00
53,450.00	Light Bill Expenses	65,350.00
42,189.50	Legal Expenses	1,12,977.00
5,979.00	Postage	5,725.00
22,184.00	Telephone Expenses	21,546.00
41,065.49	Printing & Stationery	52,272.69
69,199.00	Depreciation Expenses	62,016.00
3,76,174.26	Deposit Insurance	4,08,377.45
74,520.50	Office Insurance	74,809.00
-	Advertisements	-
1,12,912.46	Repair & Maintainance Expenses	1,46,054.92
80,669.00	Misc. Expenses	1,07,078.00
20,003.94	Office Expenses	22,810.24
34,523.00	Travelling Expenses	43,677.00
8,000.00	Motor Petrol	9,430.00
14,71,379.00	Pigmy Agnt. Commission	17,05,147.00
12,348.00	Training Expenses	19,729.00
3,808.00	Wardhapan Din Expenses	3,850.00
59,935.02	Annual General Meeting Exp.	64,015.00
-	Professional Tax Expenses	-
6,121.00	Library Expenses	7,907.00
10,000.00	Election Expenses	16,000.00
5,450.00	Education Fund Expenses	-
16,350.00	MSC Bank Asso. Membership	16,350.00
7,000.00	Marathwada Bank's Asso.	7,000.00
15,260.00	Urban Bank Federation Member fee	15,260.00
5,700.00	Govt. Security Premium Expenses	5,700.00
-	RTO Trade Certificate Charges	-
19,913.00	Previous Year Income Tax	2,18,982.00
1,95,329.00	Staff Group Gratuity	2,07,447.00
5,450.00	CIBIL Annual Fees	5,450.00
5,450.00	CRIF High Mark Annual fees	5,450.00
5,450.00	Equifax Annual Fees	5,450.00
6,280.31	Other Banks Charges Paid	5,152.44
-	Other Banks Custody of Article/Locker	-
9,782.64	CIBIL Charges Paid	13,238.38
महिला व मुलींवरील अत्याचार करणाऱ्यांविरोधात शासनाने भविष्यातही अशीच कठोर भूमिका कायम ठेवावी, असेही त्यांनी सांगितले.

नसरापूरच्या न्यायालयीन निकालाचे स्वागत; पण कोपर्डीचे काय?

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि.२९ जून-

नरसापूर घटनेचा निकाल फक्त ६० दिवसांमध्ये जाहीर करण्यात आला. अत्याचार करणाऱ्या नराधमाला ६० दिवसात निकाल पत्र देऊन मरेपर्यंत फाशीची शिक्षा सुनावण्यात आली. मात्र २०१६ साली घडलेली कोपर्डीची घटनेचे काय? असा सवाल सकल मराठा समाजाचे माऊली पवार यांनी उपस्थित केला.

कोपर्डीच्या घटनेला तब्बल दहा वर्षे झाली तरी अजून त्या ताईला न्याय मिळत नाही. दहा वर्ष झाली आरोपींना सरकार पोसतय. गुन्हेगाराला जात नसते या न्यायाने कोपर्डीच्याही घटनेचा निकाल त्वरित देण्यात यावा अन्यथा पुन्हा सकल मराठा समाजाला रस्त्यावर उतरावे लागेल, असेही ते म्हणाले

आजपर्यंत अनेक जातीमधील मुलीवर अत्याचार झाले. त्यांना अजून न्याय मिळाला नाही. यावरुन सरकार निकालाच्या बाबतीत जातिभेद करत आहे का? असा प्रश्न पडतो, असेही त्यांनी सांगितले.

आरोपीला असेच कठोर शासन व्हावी

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि.२९ जून-

पुणे जिल्ह्यातील भोर तालुक्यातील घडलेली घटना अत्यंत निंदनीय होती. चिमुकलीवर अत्याचार केल्याप्रकरणी मुख्य आरोपी भीमराव कांबळे यास पुणे न्यायालयाने कठोर शिक्षा केल्याने त्यांचे आम्ही स्वागत करतो. न्यायालयाने आरोपीला मरेपर्यंत फाशीची शिक्षा सुनावली असून, अशा गुन्हेगारांचे निकाल फास्ट ट्रॅकवर प्रकरणे घेवून लवकर लावावेत म्हणजेच आरोपींमध्ये भीती निर्माण होईल आणि पुन्हा असे गुन्हे कोठेही घडणार नाहीत, भाजपाच्या शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर यांनी सांगितले.

'त्या' पिडीतेला खरा न्याय मिळाला

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि.२९ जून-

पुणे जिल्ह्यातील भोर तालुक्यातील नरसापूर येथे चिमुकलीवर अत्याचार करून तिची निर्घृण हत्या करणाऱ्या मुख्य आरोपी असलेल्या भीमराव कांबळे याला पुणे न्यायालयाने मरेपर्यंत फाशीची शिक्षा सुनावली असल्याने 'त्या' पिडीतेला न्याय मिळाला आहे. राज्य सरकारने अशाच प्रकारचे कठोर कायदे करून लवकर निकाल लावावेत, तरच सामान्य माणसांना समाधानाने जगता येणार आहे. अवघ्या दोन महिन्यांत निकाल लागलेल्या या खटल्याचे आम्ही स्वागत करीत आहोत, असे श्रीदेवी नलावडे यांनी सांगितले.

...मग नसरापूर प्रमाणे इतर पिडितांना जलद न्याय कधी?



महाराष्ट्रातच नव्हे तर देशात दररोज निष्पाप बालिका, मुली, युवती, महिला, ज्येष्ठ महिला अत्याचाराच्या बळी पडत असल्याचे कटूसत्य कोणी नाकारू शकत नाही. नॅशनल क्राईम रेकॉर्डस् ब्युरो (NCRB) चा अहवाल याचा आरसा आहे, असे म्हटल्यास ते वावगे ठरणार नाही. शिक्षणाचे माहेरघर असे संबोधले जाणारे पुणे देखील याला अपवाद नसल्याने अनेक महिला अत्याचारांच्या घटनांवरुन सिध्द झाले आहे. दिल्लीतील निर्भया अत्याचार आणि हत्याकांडाने संपूर्ण देश पेटून उठल्याचे सर्वश्रृत आहे. त्यानंतर केंद्र आणि राज्य सरकारने देखील ठोस कारवायांची अनेक आश्वासने दिली अन् त्यातील काही पूर्ण करत कठोर कायदे देखील केले. पण महिला अत्याचारांच्या घटना काही कमी होईनासे झाले आहे, ही शोकांतिका आहे. पुणे जिल्ह्यातील भोर तालुक्यातील नसरापूर येथे ६५ वर्षाच्या भीमराव कांबळे या नराधमाने साडेतीन वर्षीय कोवळ्या चिमुकलीवर अत्याचार करुन तिचा निर्दयीपणे खूनदेखील केला. या प्रकरणाचे सर्वच समाजातून तीव्र पडसाद उमटल्यानंतर कर्तव्यदक्ष मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीदेखील आरोपीवर कठोर कारवाईचे संकेत देत खटला फास्ट ट्रॅक कोर्टात चालविण्याचे आदेश दिले. दस्तूरखुद्द मुख्यमंत्री तथा गृहमंत्र्यांचे थेट आदेश येताच पोलिसांनी अवघ्या १५ दिवसात चोखपणे तपास करुन कोर्टात १२०० पानी चार्जशीट दाखल केले. अवघ्या ५५ दिवसात या खटल्याचा फास्ट ट्रॅक निकाल आला आणि नराधम आरोपीला फाशीची शिक्षेची वार्ता ऐकताच 'त्या' चिमुकल्या मुलीच्या आई-वडिलांसह समाजातील प्रत्येक घटकाने न्यायदानाचे कौतुक केले.

मुख्यमंत्री, न्यायालय, पोलिस आणि निडर साक्षीदारांचे कौतुक होणेदेखील योग्यच आहे. परंतु अशाच महिला अत्याचार, बलात्काराचे हजारो खटले न्यायावाचून प्रलंबित आहेत. ही बाब लक्षात घेता, आम्हाला न्याय कधी मिळणार? आम्हाला का असा फास्ट ट्रॅक न्याय मिळू शकत नाही? मुख्यमंत्री, न्यायालय आणि पोलिसांना आमच्याबद्दल काहीच दयामाया नाही का? न्यायाच्या प्रतिक्षेतच आम्ही मरायचे का? अशा असंख्य प्रश्नाचे काहूर त्या-त्या प्रकरणातील पिडितांच्या मनात नसरापूर निकालावरुन येत असणार आहे.



राज्याचे संवेदनशील मुख्यमंत्री, सरन्यायाधीश, पोलिस महासंचालक आणि पोलिस यंत्रणा निष्पक्षपणे पिडित महिलांना न्यायदानाची गती वाढवतील तूर्ततरी ही अपेक्षा करणेच योग्य ठरेल.

वाढत्या गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी आणि पीडितांना तात्काळ मदत देण्यासाठी महाराष्ट्र शासनाने काही महत्त्वपूर्ण पावले उचलली आहेत. पीडित महिला व बालकांना समुपदेशन आणि कायदेशीर मदत देण्यासाठी राज्यभरात ५१ भरोसा सेल कार्यरत आहेत. महिला व बालकांच्या गुन्ह्यांचा खटला वेगाने चालवण्यासाठी ५८ फास्ट ट्रॅक न्यायालये स्थापन करण्यात आली आहेत. महिलांच्या सुरक्षेसाठी निर्भया पथक, दामिनी पथक, पोलीस काका आणि पोलिस दीदी हे उपक्रम सुरु आहेत. तात्काळ मदतीसाठी २४ तास सुरु असणारे हेल्पलाइन क्रमांक पुढीलप्रमाणे आहेत. महिला हेल्पलाइन, १०९१ बालकांसाठी (Childline): १०९८आपत्कालीन पोलिसांची मदत: ११२ सविस्तर कायदेशीर माहिती आणि साहाय्यासाठी महाराष्ट्र पोलीसांचे अधिकृत पोर्टल सुरु आहे. तरीपण महिला अत्याचार, अन्याय, बलात्काराच्या घटना कमी होत नाहीत, हे दुर्दैवी आहे.

नॅशनल क्राईम रेकॉर्डस् ब्युरो (NCRB) च्या ताज्या अहवालानुसार, महिलांवरील अत्याचाराच्या घटनांमध्ये महाराष्ट्र देशात उत्तर प्रदेशपाठोपाठ दुसऱ्या क्रमांकावर आहे. राज्यात एकूण नोंदवलेल्या गुन्ह्यांमध्ये महिला, अल्पवयीन मुली आणि ज्येष्ठ महिलांवरील अत्याचाराची आकडेवारी पुढीलप्रमाणे आहे. एकूण महिलांवरील अत्याचार (तरुण व प्रौढ महिला) एकूण गुन्हे : NCRB च्या वार्षिक आकडेवारीनुसार, महाराष्ट्रात महिलांवरील अत्याचाराचे एकूण ४७,९५४ गुन्हे नोंदवले गेले आहेत. बलात्कार आणि गंभीर गुन्हे : सन २०२५ मध्ये राज्यात ८,६४३ बलात्काराच्या घटनांची नोंद झाली असून, मागच्या वर्षाच्या तुलनेत यात ७०३ गुन्ह्यांची वाढ झाली आहे. तसेच २५ हून अधिक प्रकरणांमध्ये बलात्कारानंतर हत्येच्या घटना घडल्या आहेत. सर्वाधिक प्रभावित असणारी शहरे अशी आहेत. राज्यात मुंबईत महिलांविरोधातील गुन्ह्यांचे सर्वाधिक (६,३५८) गुन्हे नोंद झाले आहेत, तर पुणे दुसऱ्या (२,६३१) आणि नागपूर तिसऱ्या क्रमांकावर आहे.

अल्पवयीन मुलींवरील अत्याचार (बालगुन्हेगारी) एकूण गुन्हे : बालकांवरील व अल्पवयीन मुलींवरील अत्याचाराच्या बाबतीत महाराष्ट्र देशात पहिल्या क्रमांकावर असून, राज्यात २४ हजार १७१ गुन्हे नोंदवले गेले आहेत. पोस्को अंतर्गत अल्पवयीन मुलींवरील लैंगिक अत्याचार आणि विनयभंगाच्या घटनांचा मोठ्या प्रमाणावर समावेश आहे. सन २०२५ मधील आकडेवारीनुसार बालकांवरील अत्याचाराच्या गुन्ह्यांमध्ये ४८२ ने वाढ झाली आहे. महाराष्ट्रात ज्येष्ठ नागरिकांवरील (ज्यामध्ये वृद्ध महिलांचा समावेश सर्वाधिक आहे) अत्याचाराचे ४ हजार ९१८ गुन्हे नोंदवले गेले आहेत. हत्या आणि जबरी चोरी करणे. वृध्द महिलांना एकटे पाहून त्यांच्यावर दरोडे घालणे किंवा जबरी चोऱ्या करणे यांसारखे प्रकार घडतात. वर्षभरात १८५ वृद्धांच्या हत्येची नोंद पोलीस दप्तरी झाली आहे. यातील अनेकांना न्यायदेखील मिळाला असेल.

अनेक ठिकाणी मर्डर होतात, पण आरोपी निर्दोष सुटतात हे वास्तव आहे. पुराव्या अभावी, तपासातील त्रुटी, साक्षीदार फुटणे आदी अशा अनेक प्रकारामुळे आरोपी निर्दोष सुटतात. मग कोणी तरी खून केला आहे ना तो खूनी का सापडत नाही. न्यायालय अनेकदा तपासावर ताशेर ओढते पण त्याचे पुढे काय होते. आपल्या देशातही निर्दोष सुटलेल्या प्रकरणात तपास अधिकाऱ्यांची आणि साक्षीदारांची गोपनीय चौकशीचे आदेश न्यायदेवतेने दिले पाहिजेत. या खटल्यात ज्यांनी कोणी हयगय केली, अशांना शिक्षा झाली तरच असे गुन्हे करण्यास आरोपी धजावणार नाहीत. कारण नसरापूरचा आरोपी भीमराव कांबळे याला यापूर्वी एकादा निर्दोष सुटला आणि त्यानंतर त्याने एका चिमुलीवर बलात्कार करून तीची हत्या केली. तो त्यावेळी कसा निर्दोष सुटला याचा गोपनीय तपास झाला असता तर कदाचित चिमुकली वाचली असती. न्यायदानापासून वंचित पिडित महिलांना तातडीने न्याय मिळण्यासाठी आणि निर्दोष खटल्यातील तपास अधिकारी, फुटलेल्या साक्षीदारांची गोपनीय चौकशी करण्याचे आदेश न्यायदेवता नक्कीच देईल, इतका विश्वास भारतीयांचा न्यायदेवतेवर निश्चितच आहे!

न्यायासंदर्भात कठोर संदेश

सोलापूर, दि.२९ जून-

नसरापूर प्रकरणातील आरोपी भीमराव कांबळेला मरेपर्यंत फाशीची शिक्षा सुनावली. त्या निष्पाप चिमुरडीला न्याय मिळाल्याची भावना निर्माण झाली. याद्वारे न्यायासंदर्भात कठोर संदेश दिला गेला, असे सोलापूर महापालिका स्थायी समितीच्या रंजीता चाकोते यांनी सांगितले.

या निर्णयामुळे तिचा हिरावून घेतलेला जीव परत येणार नाही, तिच्या आई-वडिलांनी आणि कुटुंबाने सोसलेल्या वेदना कधीच भरून निघणार नाहीत. अशा घृणास्पद कृत्याचा विचार करणाऱ्या प्रत्येक विकृत प्रवृत्तीने शंभर वेळा विचार करुनच पाऊल उचलावे, असा धाक या शिक्षेमुळे निर्माण होईल. या प्रकरणात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तातडीने आणि ठाम भूमिका घेतल्याबद्दल त्यांचे आभार.

तुळशीअर्चन पूजेची आजपासून ऑनलाईन नोंदणी

तभा वृत्तसेवा,
पंढरपूर, दि.२९ जून-

श्रीविठ्ठल-रुक्मिणी मातेची तुळशी अर्चन पूजा मंदिर समितीकडून भाविकांना उपलब्ध करून देण्यात येत असून दि. ०१ ते ०९ जुलै, २०२६ या कालावधीतील तुळशी अर्चन पुजेची ऑनलाईन पध्दतीने नोंदणी करण्याची सुरवात दि. ३० जून रोजी स.११.०० पासून होत असल्याची माहिती कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली. या पूजेसाठी रुपये २१००/- इतके देणगी मूल्य आहे. दिनांक ०१ जुलै ते ०९ जुलै या कालावधीतील गदींचे व सण- उत्सवाचे दिवस वगळून भाविकांना पूजा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. पूजेची नोंदणी https://www.vitthalrukmini-mandir.org या मंदिर समितीच्या अधिकृत संकेतस्थळावरून करता येणार आहे. अधिक माहितीसाठी मंदिर समितीच्या ०२१८६-२९९२९९ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा, असे व्यवस्थापक प्रवीणकुमार घम यांनी सांगितले.

आजपासून मतदार पडताळणी मोहीम

माळशिरस, दि. २९ जून-

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार मंगळवार, दि. ३० जून पासून विशेष सखोल परिक्षण मोहिम सुरु होत आहे. सदर मोहिम दि. २९ जुलै २०२६ पर्यंत सुरु राहील. सदर मोहिमेत मतदान केंद्रस्तरीय अधिकारी घरोघरी मतदारांना भेटी देवून पडताळणी करतील. मतदारांचे गणना फॉर्म मतदारांना देवून भरुन घेण्यात येतील. भरलेले सर्व फॉर्म्सचे संगणकीकरण करण्यात येईल. मतदारांनी अचूक माहिती नमूद करुन फॉर्म भरुन देणे आवश्यक आहे. प्रथम भेटीत मतदारांची भेट न झाल्यास बी.एल.ओ. एकूण ३ वेळा भेट देतील. ज्या मतदारांचे फॉर्म्स भरुन घेणार नाहीत; त्यांची नावे दि.५ ऑगस्ट २०२६ रोजी प्रसिध्द होणाऱ्या प्रारुप मतदार यादीत समाविष्ट होणार नाहीत. दि. ५ ऑगस्ट ०२६ ते ४ सप्टेंबर २०२६ या कालावधीत दावे हरकती दाखल करता येतील. दि. ३ ऑक्टोंबर २०२६ पर्यंत अंतिम मतदार यादी प्रसिध्द करणेत येईल, असे जिल्हा प्रशासनाकडून कळविण्यात आले.

घरासमोर रिक्षा लावण्यावरुन वाद; तरुणाला कड्याने मारहाण

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २९ जून-

रिक्षा लावण्यावरून झालेल्या वादातून एका तरुणाला शिवीगाळ करत हातातील कड्याने मारहाण करून जखमी केल्याची घटना शास्त्री नगर भागात घडली आहे. २८ जून २०२६ रोजी सकाळी १०:३० च्या सुमारास ही घटना घडली.या प्रकरणी सदर बाजार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गंगाधर सिद्राम वळ्ळापोलू (रा. बापूजी नगर, सोलापूर) यांनी फिर्यादी दिली. याप्रकरणी विजापूर सुलतान सिकंदर तोनशाळ (रा. १६, शास्त्री नगर, सोलापूर) याच्याविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे. शास्त्री नगर येथील रहिवासी गंगाधर वळ्ळापोलू यांनी सुलतान तोनशाळ याला तायम्मा मंदिर जवळील घरासमोर रिक्षा लावू नका, अशी विनंती केली होती. मात्र, याचा राग आल्याने सुलतान तोनशाळ याने गंगाधर वळ्ळापोलू यांना ''तू कोण मला सांगणारा'' असे म्हणत अश्लील भाषेत शिवीगाळ केली. एवढ्यावरच न थांबता आरोपीने फिर्यादीला दमदाटी करत हातातील कड्याने त्यांच्या डोक्यावर आणि नाकावर प्रहार करून त्यांना जबर जखमी केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

५ लाख रुपये आणण्यासाठी विवाहितेचा छळ; पतीसह पाच जणांवर गुन्हा

प्लॉट घेण्यासाठी माहेरून ५ लाख रुपये आणण्याच्या मागणीसाठी विवाहितेचा शारीरिक व मानसिक छळ झाला. ही घटना उत्तर सोलापूर तालुक्यातील कुमठे गावात घडली. याप्रकरणी पतीसह सासरच्या पाच जणांविरुद्ध विजापूर नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कहेकशा अशपाक काझी (एस. के. नगर, कुमठे गाव, उत्तर सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पती अशपाक, सासू मुबिन, सासरे सरफराज, नणंद निशाद आणि शगुफ्ता यांच्याविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे. पती अशपाक, सासू मुबिन, सासरे सरफराज, नणंद निशाद आणि शगुफ्ता यांनी संगनमत करून प्लॅटसाठी माहेरून ५ लाख रुपये आणण्यासाठी तगादा लावला होता. या मागणीसाठी त्यांना शारीरिक व मानसिक त्रास देण्यात आला. तक्रार अर्जाच्या चौकशीसाठी कौन्सेलिंगला गेल्या असता, पती अशपाक याने त्यांना तलाक, तलाक, तलाक असे म्हणून शिवीगाळ केली. सासरे सरफराज यांनी फिर्यादी घराची कामे करत असताना त्यांना चुकीच्या पद्धतीने स्पर्श केल्याचा आरोपही फिर्यादीने केला आहे. हा सर्व प्रकार २८ मे २०२४ ते २३ मे २०२६ या कालावधीत घडली आहे.

इतर प्रकरणातही अशीच तत्परता दाखवावी

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि.२९ जून-

नरसापूरच्या प्रकरणात अतिशय जलदगतीने निकाल दिल्याबद्दल न्यायव्यवस्थेचे आभार. सदर घटना घडल्यावर समाजमनाचा उद्रेक पहावयास मिळाला होता. परंतु मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महायुती सरकारने अतिशय संयमाने, जबाबदारीने परिस्थिती हाताळली. लवकरात लवकर न्याय मिळण्याच्या दृष्टीने त्यांनी पाठपुरावा केला. त्यामुळे या निकालाचे श्रेय खऱ्या अर्थाने मुख्यमंत्री फडणवीस आणि महायुती सरकारला दिले पाहिजे. मुली, महिलांवरील अन्याय-अत्याचारांच्या इतर प्रकरणातही अशीच तत्परता दाखवावी; हीच एक अपेक्षा यानिमित्ताने व्यक्त करते, असे जि.प.च्या समाजकल्याण विभागाच्या सभापती संस्कृती सातपुते यांनी सांगितले.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, स्वेतसागर निवास, राजमाता जिजामाता महाविद्यालयजवळ, पत्रकार रोड, शिवनगर, जि. लातूर - ४१३५१२. कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. **RNI No. MAHMAR/2023/86477. E-mail starunbharatgmail.com. ● Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003. **Publised at** TARUN BHARAT OFFICE, SwetSagar Niwas, Near Rajmata Jijamata College, Patrakar Road, Shivnagar, Dist. Latur Pin 413512, **RNI No. MAHMAR/2023/86477**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

CMYK

लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

लातूर जिल्ह्यात चोवीस तासांत सरासरी १३.९ मिलीमीटर पावसाची नोंद

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. २९ जून : जिल्ह्यात २९ जून रोजी सकाळी आठ वाजता संपलेल्या चोवीस तासांत सरासरी १३.९ मिलीमीटर पावसाची नोंद झाली आहे.

यामध्ये रेणापूर तालुक्यात सर्वाधिक २९.७ मिलीमीटर, तर देवणी तालुक्यात सर्वात कमी १.२ मिलीमीटर पाऊस झाला आहे.

तालुकानिहाय पावसाची आकडेवारी पुढीलप्रमाणे आहे - लातूर - २१.७, औसा- ६.०, अहमदपूर- १४.४, निलंगा- १.९, उदगीर - १६.२, चाकूर - २१.०, रेणापूर - २९.७, देवणी - १.२, शिरूर अनंतपाळ - १३.३ आणि जळकोट - १५.७ मिलीमीटर.

विविध वृत्त...

टीईटी परीक्षा रद्द झाल्याने उमेदवार चिंतेत

तभा वृत्तसेवा

लातूर : महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा २०२६ (टीईटी) रद्द झाल्याने अभ्यास करून तयारी केलेल्या उमेदवारांची आता चिंता वाढली असून, आता पुढे कधी परीक्षा होणार, याकडे उमेदवारांचे लक्ष लागले आहे. शनिवारपासून टीईटी परीक्षा रद्द झाल्याची चर्चा असून, उलटसुलट प्रतिक्रिया उमटत आहेत. बहुतांश उमेदवारांनी रात्रंदिवस अभ्यास करून परीक्षेची तयारी केली होती. या संपूर्ण तयारीवर पाणी फेरल्याने उमेदवार सध्या चिंतेत आहेत.

या परीक्षेला शिक्षकही बसले होते. बऱ्याच शिक्षकांनी वेळात वेळ काढून परीक्षेची तयारी केली होती. आता परीक्षा पेपर फुटल्याने पुढे ढकलली. ती कधी आयोजित केली जाणार, हे अजून स्पष्ट झालेले नाही. उमेदवारांनी एकाच परीक्षेचा अभ्यास किती वेळा करायचा ? असा प्रश्न उमेदवारांसमोर उभा आहे. केलेली तयारी वाया गेली. जसे नीट परीक्षेच्या बाबतीत घडले, तसेच टीईटी परीक्षेच्या बाबतीत घडले असून, शासनाच्या परीक्षा घेणाऱ्या यंत्रणांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्हा निर्माण झाले आहे. सर्व शासकीय यंत्रणा हतबल झाल्याचे चित्र पेपरफुटी प्रकरणातून समोर येत आहे.

विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती परीक्षेचे शुल्क जि. प. भरणार

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २९ जून : शहरी व ग्रामीण भागातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या ज्या की शहरी व महानगरपालिका जिल्हार पालिपरिषद, भागातील जि. व नगरपालिकांच्या शाळेत शिकणारे प., नपा विद्यार्थी प्रामुख्याने विद्यार्थ्यांना होणार आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील असतात. या विद्यार्थ्यांना आर्थिक मर्यादांमुळे परीक्षा शुल्क भरणे शक्य होत नाही. त्यामुळे चौथी व सातवीच्या विद्यार्थ्यांकरिता येथून पुढे शिष्यवृत्ती परीक्षेचे शुल्क भरण्याची गरज भासणार नाही. हे शुल्क शासन भरणार आहे.

जिल्हा परिषद, महानगरपालिका व नगरपालिका शाळांत शिकणारे प्रज्ञावान विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेत सहभागी होण्यापासून वंचित राहणार नाहीत, यासाठी शासनाने हा निर्णय घेतला. राज्यातील सर्व ग्रामीण जिल्हा परिषदेच्या अधिनस्त शाळांतील मनपा, शाळांतील शिष्यवृत्ती परीक्षेस प्रविष्ट विद्यार्थ्यांचे लाभपरीक्षा शुल्क तसेच शाळा संलग्नता शुल्क जिल्हा परिषदेच्या स्वनिधीतून भरण्याचा निर्णय शासनाने जाहीर केला. त्यामुळे जिल्हा परिषदेचा सेस फंड आता गोरगरीब विद्यार्थ्यांच्या मदतीला येणार आहे.

यासाठी जिल्हा परिषदांनी स्वउत्पन्न अंदाजपत्रकात ५ टक्के निधी चौथी व सातवी विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती परीक्षेची फीस व शाळा संलग्नता शुल्क भरण्यासाठी राखून ठेवावेत, असे शासन निर्णयात म्हटले आहे.

उपवर्गीकरणा विरोधात ६ जुलैला महामोर्चा

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २९ जून : अनुसूचित जातींच्या आरक्षणात प्रस्तावित उपवर्गीकरणाविरोधात अनुसूचित जातीतील सर्व ५९ जाती, आंबेडकरवादी पक्ष संघटना तसेच संविधानवादी नागरिकांच्यावतीने सोमवारी (दि. ६ जुलै) लातूर येथे 'अनुसूचित जाती उपवर्गीकरणविरोधी महामोर्चा' आयोजित करण्यात आल्याची माहिती पत्रकार परिषदेत देण्यात आली.

हा महामोर्चा डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकातून सकाळी निघून तो जुने जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकणार आहे.

मोर्चात अनुसूचित जातीतील सर्व ५९ जातींचे प्रतिनिधी सहभागी होणार आहेत. कोणत्याही प्रकारचे उपवर्गीकरण होऊ नये, अनुसूचित जातींच्या घटनात्मक हक्कांचे संरक्षण व्हावे, सामाजिक न्यायाचे तत्त्व अबाधित राहावे, ही या महामोर्चाची प्रमुख भूमिका असल्याचे समितीने स्पष्ट केले.

अनुसूचित जातींसाठी शासकीय सेवेतील प्रलंबित अनुशेष भरावा, आरक्षित पदे विशेष भरतीद्वारे भरावीत, अनुसूचित जातींच्या घटनात्मक हक्कांचे प्रभावी संरक्षण करावे, अशा प्रमुख मागण्या करण्यात येणार आहेत.

लातुरातील अनेक हॉटेल्समध्ये तात्काळ 'टीएम इफेक्ट' लागू..!

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. २९ जून : एक प्रामाणिक आणि कर्तव्यकठोर अधिकारी काय करू शकतो ? याचे मूर्तिमंत उदाहरण राज्याचे नवनियुक्त अण्णा व औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंडे यांनी दाखवून दिले आहे. त्यांनी दि. २४ जून २०२६ रोजी हॉटेलमध्ये आलेल्या ग्राहकांना बाटलीबंद पाणी विकत घेण्यास भाग पाडता येणार नाही, असे आदेश काढले होते. राज्यातील अन्य शहरात त्या आदेशाची अंमलबजावणी कितपत झालीय याची कल्पना नाही. मात्र, लातूर शहरातील अनेक हॉटेलमध्ये मागच्या एक दोन दिवसांपासून सादर आदेशाचे पालन केले जात असल्याचे पाहावयास मिळत आहे. मुंडे यांच्या या आदेशाला लातुरात ' टीएम इफेक्ट' असे संबोधले जात आहे.





तरूण भारत स्पेशल श्रीधर स्वामी

अन्न व औषध प्रशासन विभागाच्या आयुक्तपदी आतापर्यंत अनेक अधिकारी विराजमान झाले आणि निघूनही गेले. परंतु आजपर्यंत एकाही अधिकाऱ्याने एवढ्या प्रामाणिकपणे कर्तव्य बजावले नाही, याची प्रचिती आता समाजातील सामान्यातील सामान्य नागरिकालाही अल्पावधीत येत आहे. अन्न व औषध प्रशासन आयुक्तांचे खरे अधिकार काय असतात, याचीच प्रचिती सद्यस्थितीत प्रत्येक महाराष्ट्रीयन नागरिकाला येत असलेली पाहावयास मिळत आहे. तुकाराम मुंडे यांच्याबद्दल माहिती नाही,अशी एकही व्यक्ती राज्यात आढळून येणार नाही. ते ज्या ज्या विभागात सेवारत होते, त्या विभागात अक्षरशः क्रांती घडवण्याचे काम केले आहे. म्हणूनच त्यांना एक वर्षच नाही तर अवघ्या काही दिवसात या विभागातून त्या विभागात बदलून नाहक त्रास देण्याचे कामही वरिष्ठ शासकीय स्तरावरुन झाल्याचे सर्वज्ञात आहे. तुकाराम मुंडे यांनीही कधी आपल्या बदलीबद्दल ब्र शब्दही काढल्याचे ऐकिवात नाही. आपली जेथे नियुक्ती केली जाईल, त्या विभागात स्वच्छता मोहीम राबविण्याचे काम त्यांनी अत्यंत निष्ठेने केले आहे.

तुकाराम मुंडे यांच्याकडे मे २०२६ पासून अन्न व औषध प्रशासन विभागाच्या आयुक्तपदाची जबाबदारी देण्यात आली आहे. ही जबाबदारी स्वीकारल्यानंतर अवघ्या काही दिवसातच या विभागातही ' टीएम इफेक्ट' झपाट्याने दिसायला लागला. त्यांनी या विभागांतर्गत येणाऱ्या सर्वच उत्पादनांचे निकष तपासून त्यावर कठोर कार्यवाही करण्याचे आदेश काढले. या विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांना तुकाराम मुंडे अर्थात ' टीएम ' यांच्या आदेशाचे पालन करणे बंधनकारक आहे. आतापर्यंत संबंधित उत्पादक, विक्रेते, व्यापाऱ्यांकडून ' लक्ष्मी ' दर्शनाचा लाभ घेऊन त्यांच्या अनेक चुकीच्या कामाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांचीही त्यामुळे जणू पाचावर धारण बसली. अधिकाऱ्यांकडून कर्तव्यात कुचराई झाल्यास ' टीएम ' सहकारी अधिकाऱ्यांचीही गय करत नाहीत, हे सगळ्यांना माहिती आहे. त्यामुळेच हा विभाग सध्या राज्यात सर्वाधिक चर्चेत आला आहे, तो केवळ ' टीएम ' मुळे हे काही वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही.

अन्न व औषध प्रशासन विभागांतर्गत येणाऱ्या हॉटेल विभागातही चुकीच्या पद्धतीने काम केले जात होते. ग्राहक कोणत्याही हॉटेलमध्ये गेला की, हॉटेलमधील कर्मचारी ग्राहकाने ऑर्डर देण्यापूर्वीच त्याच्यासमोर पॅकेज्ड पाण्याची बाटली आणून ठेवत असत. अनेक हॉटेलमध्ये तर पिण्याचे पाणी मागितले तरी ते बंद बाटलीच पुढे आणून ठेवता असत. वास्तविक पाहता ग्राहकांना शुद्ध पिण्याचे पाणी पुरविण्याची जबाबदारी संबंधित हॉटेल चालकांची असते. ही बाब आतापर्यंत जवळपास सगळे विसरूनच गेले होते. तुकाराम मुंडे यांच्या निदर्शनास ही गोष्ट येताच त्यांनी दि. २४ जून रोजी एक आदेश काढून ग्राहकांना मोफत सुरक्षित पाणी देणे कसे बंधनकारक तसेच प्रत्येक आस्थापनात ' सुरक्षित पिण्याचे पाणी येथे विनामूल्य उपलब्ध आहे 'असा फलक लावण्याबाबतही आदेशीत करण्यात आले आहे.

लातूर शहरातील अनेक हॉटेलमध्ये 'टीएम ' यांच्या आदेशाची अंशतः अंमलबजावणी सुरु करण्यात आल्याचे पाहावयास मिळत आहे. अनेक हॉटेलमध्ये आता ग्राहकांसमोर बंद पाण्याची बाटली न ठेवता शुद्ध पाण्याच्या पेट जार बॉटल्स ठेवल्या जात आहेत. त्यामुळे 'टीएम ' इफेक्ट' ची किमान सुरुवात लातुरात झाल्याचे निदर्शनास येत आहे. आता हॉटेल्समध्ये ' सुरक्षित पिण्याचे पाणी येथे विनामूल्य उपलब्ध आहे ' असे फलक कधी लावले जातात, याची ग्राहकांना प्रतिक्षा आहे. पाहू या, असे फलक कधीपासून हॉटेल्समध्ये दर्शनी भागात डकवले जातात ते.

लातूर शहरातील ३९,३९७ बालकांना दिली लसीची मात्रा

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २९ जून : राज्य शासन केंद्रशासन तसेच यांच्याकडून प्राप्त झालेल्या मार्गदर्शक सूचनेनुसार लातूर शहरात दि. २८ जून रोजी पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेचे आयोजन करण्यात आले होते. शहरातील ३९ हजार ३९७ बालकांना लसीची मात्रा पाजण्यात आली.



सदर मोहिमेचे उद्घाटन माता रमाई आंबेडकर स्त्री रुग्णालय लातूर येथे शहराच्या महापौर जयश्रीताई सोनकांबळे, सभागृह नेते विजयकुमार साबदे, नगरसेवक सचिन गायकवाड, इब्राहिम शेख तसेच उपायुक्त श्रीमती वसुधा फड व स्त्री रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. शिवशंकर नागापुरे तसेच स्त्री रुग्णालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी व आरोग्य अधिकारी डॉ. शंकर भारती व त्यांच्या कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांच्या उपस्थितीत पार पाडला.

४२,८२३ लाभार्थ्यांना (० ते ५ वर्ष वयोगटातील) पोलिओची मात्रा पाजण्याचे उद्दिष्ट लातूर शहर महानगरपालिकेस निर्धारित करण्यात आले होते. त्या अनुषंगाने आरोग्य विभागाने हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी शहरांमध्ये २४० ठिकाणी बुघ कार्यान्वित केले होते. ३९३९७ (९२ टक्के) एवढ्या पात्र बालकांना पोलिओ लसीची मात्रा पाजण्यात आली. यामध्ये बूथवर लस पोचवण्याकरिता निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके यांनी काढलेल्या वाहन अधिग्रहण आदेशामुळे ही मोहीम यशस्वी होण्यास मोलाची मदत झाली.

यामध्ये शहरातील विविध नर्सिंग कॉलेज मधील विद्यार्थी तसेच मांजरा आयुर्वेदिक कॉलेज येथील विद्यार्थी तसेच आरोग्य विभागातील आशा स्वयंसेविका, अंगणवाडी कार्यकर्ती, आरोग्य कर्मचारी, आरोग्य सहाय्यक पार्श्वनाथ पाटील यांच्या सहकार्याने ही मोहीम यशस्वीपणे पार पाडण्यात आली.

दिनांक ३० जून ते ४ जुलैपर्यंत आरोग्य कर्मचाऱ्यामार्फत उर्वरित बालके यांना गृहभेटी द्वारे पोलिओची मात्रा पाजण्यात येणार आहे. तरी गृहभेटीस येणाऱ्या आरोग्य कर्मचाऱ्यास सहकार्य करून आपल्या पात्र बालकांना ही मात्रा देण्यात यावी असे आवाहन लातूर शहर महानगरपालिका मार्फत करण्यात येत आहे.

मुख्यालयी न राहणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांवर कारवाई करणार : पालकमंत्री

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २९ जून : जिल्ह्यातील मुख्यालयी वास्तव्यास न राहता घरभाडे भत्ता घेणारे तसेच शासनाच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर सखोल चौकशी करून कठोर कारवाई करण्यात यावी, या मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते निजाम दस्तगीर शेख यांनी सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री श्रीमंत छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले यांची भेट घेऊन सविस्तर निवेदन सादर केले.

निवेदनात लातूर, रेणापूर, औसा, अहमदपूर, चाकूर, उदगीर, निलंगा, देवणी, जळकोट आणि शिरूर-अनंतपाळ या सर्व तालुक्यांतील गटविकास अधिकारी, ग्रामविकास अधिकारी (ग्रामसेवक), शिक्षक, तलाठी, मंडळ अधिकारी, कृषी सहाय्यक, आरोग्य विभागातील अधिकारी-कर्मचारी तसेच इतर शासकीय कर्मचाऱ्यांच्या मुख्यालय निवास, घरभाडे भत्ता आणि बायोमेट्रिक उपस्थितीची सखोल चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

मुख्यालयी वास्तव्यास न राहता घरभाडे भत्ता घेतल्याचे आढळल्यास संबंधितांकडून शासनाचे आर्थिक नुकसान वसूल करून त्यांच्यावर विभागीय तसेच कायदेशीर कारवाई करावी. तसेच तक्रारींकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करून त्यांच्यावरही नियमानुसार कारवाई करण्यात यावी, अशी मागणी निवेदनात करण्यात आली.

यावेळी पालकमंत्री श्रीमंत छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी निवेदनाची गांभीर्याने दखल घेत, मुख्यालयी न राहणाऱ्या कोणत्याही अधिकारी अथवा कर्मचाऱ्याला पाठीशी घालणार नाही. जिल्हाधिकाऱ्यांकडून या प्रकरणाची सविस्तर माहिती मागविण्यात येईल. चौकशीत दोषी आढळणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांवर निश्चितपणे कारवाई करण्यात येईल, असे स्पष्ट आश्वासन दिले.

संघटन शक्तीनेच शेतकऱ्यांचे प्रश्न सुटतील

शेतकरी मेळाव्यात दादा लाड यांनी दिला शेतकऱ्यांना विश्वास

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २९ जून : शेतीतील संशोधन व आधुनीक तंत्रज्ञानाचा वापर यातून वाढलेले उत्पन्न तसेच शेतकर्यांनी संघटीत होऊन लढा दिला तर शेतकर्यांचे प्रश्न सुटतील व त्यांना सन्मानाने आपले जीवनमान जगता येईल. त्यासाठी भारतीय किसान संघ राज्यभर शेतकर्यांचे मेळावे घेत असून या मेळाव्याच्या माध्यमातून शेतकर्यांना संघटीत करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. शेतकर्यांच्या अनेक अडचणी असल्या तरी त्यावर मात करण्यासाठी संघटन महत्वाचे असल्याचे सांगून भारतीय किसान संघाच्या माध्यमातून यापुढीलच्या काळात आपल्याला तीव्र संघर्ष करावा लागेल, असे प्रतिपादन पद्मश्री कृषी संशोधक डॉ. श्रीरंगदादा लाड यांनी राजूर (अहमदपूर) येथील भव्य शेतकरी मेळाव्यात केले.



भारतीय किसान संघाच्या वतीने राजूर येथील रूद्धा पाटीजवळील साईगणेश मंगल कार्यालयात हा मेळावा आयोजीत करण्यात आला होता. या मेळाव्यात डॉ. श्रीरंगदादा लाड हे प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. यावेळी भारतीय किसान संघाचे जिल्हाध्यक्ष तुकाराम येलाले, माजी आ. बब्रुवान खंदाडे, तालुका कृषी अधिकारी सचिन बावगे, निवृत्त सिंचन सचिव घोटे, महिला विभाग प्रमुख शामलताई हुरदळे आदीसह संघ स्वयंसेवक व्यासपीठावर उपस्थित होते. प्रारंभी भारतीय किसान संघाच्या वतीने तालुक्यातील प्रगतशील शेतकर्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी बोलताना श्रीरंगदादा लाड म्हणाले, शेतकर्यांच्या उत्पन्नावरच देशाचे उत्पन्न अवलंबून असून शेतीचे उत्पन्न वाढले पाहिजे यासाठी शेतकर्यांनी तंत्रज्ञानाचा वापर केला पाहिजे. तंत्रशुद्ध पद्धतीने विक्रमी उत्पन्न मिळू शकते असा आपला अनुभव असून कापूस या पिकावर आपण प्रयोग करून एकरी २५ क्विंटल कापूस उत्पादीत होऊ शकते हे संशोधनातून आपण यापूर्वी सिद्ध केले आहे. तसेच या पुढील काळात शेतकर्यांच्या उत्पन्नात वाढ व्हावी यासाठी अनेक नवनवीन प्रयोग करण्याचा आपला संकल्प असून ज्वारीच्या उत्पन्नात वाढ होण्यासाठी संशोधन सुरू आहे. एकरी किमान ५० क्विंटल ज्वारीचे उत्पन व्हावे याबाबत संशोधन सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच शेतीचे उत्पन्न वाढीबरोबरच शेतमालाला योग्य ती किंमत मिळण्यासाठी आपण सर्वजण एकत्र येऊन संघर्ष उभा करावा लागेल, अशी भूमिका डॉ. लाड यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणातून व्यक्त केली. यावेळी तालुका कृषी अधिकारी सचिन बावगे, निवृत्त सिंचन सचिव घोटे, मधुमक्षीका पालक दिनकर पाटील आदिंनी आपले मनोगत व्यक्त केले.

अध्यक्षीय भाषणात माजी आ. बब्रुवान खंदाडे यांनी शेतकर्यांचे उत्पन्न दुप्पट झाले पाहिजे. त्यासाठी सरकार दरबारी अनेक योजना असल्या तरी तंत्रज्ञानाचा शेतकर्यांनी स्वीकार करून शेतीतील उत्पन्न वाढविण्यासंदर्भात प्रयत्नशील असणे गरजेचे आहे. शेतीतून अधिक उत्पन्न मिळविण्यासोबतच कृषीमाला योग्य तो देऊन सरकारने शेतकर्यांना समाधानी करणे गरजेचे आहे. भारतीय किसान संघाचे काम शेतकर्यांच्या संघटीत व उत्पन्न वाढीसाठी असल्याचे सांगून शेती व शेतकर्यांना सन्मान मिळावा यासाठी भारतीय किसान संघ संपूर्ण देशभर वेगवेगळे अभियान व उपक्रम राबवून शेतकर्यांचे विविध प्रश्न शासन दरबारी मांडत आहे. शेतकर्यांना पीक विमा, पिक विम्या संदर्भातील जाचक अटी याबाबतच्या समस्यांचे त्यांनी उपस्थितांसमोर मांडून याबाबत किसान संघाने यावर सरकार दरबारी भावना पोहचविण्याचे काम करावे, अशी अपेक्षाही माजी आ. खंदाडे यांनी व्यक्त केली.

यावेळी माजी सभापती अशोककाका केंद्रे, भाजपचे माजी जिल्हाध्यक्ष दिलीपराव देशमुख, भाजपचे प्रदेश प्रवक्ते गणेशदादा हाके, राजूर (अहमदपूर) नगराध्यक्ष स्वप्नील व्हते, माजी नगराध्यक्ष ॲड. भारत चामे, माजी जि. प. सदस्य त्रिंबक गुट्टे, राजकुमार मजगे, नगरसेवक सिद्धार्थकुमार सूर्यवंशी, माजी सभापती अनुसयाताई केंद्रे यांच्यासह महिला व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

रिलेशानी कार्यशाळेस उत्स्फूर्त प्रतिसाद



तभा वृत्तसेवा

लातूर दि. २९ जून : सध्याच्या काळात किशोरवयीन मुलांच्या मानसिक तणावात वाढ होत आहे, पालकांमध्ये आपल्या मुलांच्या वर्तनाबद्दल ताण वाढत आहे. शिक्षकांनाही विद्यार्थ्यांच्या वर्तनाबाबत चिंता वाटत आहे. या साऱ्यावरचा सर्वात प्रभावी उपाय म्हणजे मनमोकळा संवाद साधणे. खुल्या मनाने साधलेल्या संवादामुळेच नातेसंबंध सुदृढ होण्यास मदत होणार आहे, असे विचार 'रिलेशानी' कार्यशाळेत मांडण्यात आले.

येथील श्रीकिशन सोमाणी विद्यालयात नंदकिशोर भार्गव शिक्षण अभियान अंतर्गत पुण्याच्या आरोग्यभान संस्थेच्यावतीने विद्यालयातील सर्व शिक्षक,शिक्षकांसाठी दोन दिवसीय रिलेशानी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. त्यासोबतच पालकांसाठी एक सत्र व विद्यार्थ्यांसाठी एक सत्र घेण्यात आले.

आरोग्यभान संस्था गेल्या ३१ वर्षापासून शहर, खेड्यापाड्यात, आदिवासी भागात लोकांशी आरोग्य संवाद साधत असते. या संस्थेचा आणखीन एक महत्त्वाचा उपक्रम म्हणजे ' रिलेशानी' शिबीर. रिलेशानी म्हणजे सुंदर, समृध्द, सुरक्षित शानदार नातेसंबंध. वयात आलेल्या मुलांना आपल्या शरीरातील बदलाबद्दल, मैत्री, प्रेम, आकर्षण याबाबत असंख्य प्रश्न निर्माण झालेले असतात. या प्रश्नांची उत्तरे शोधण्याच्या प्रयत्नान ब-याचदा या मुलांची दिशा भरकटत जाते, मनाचा प्रचंड गोंधळ होतो हा गोंधळ अतिशय संवेदनशिलतेने हाताळण्याची गरज असते. त्याचे महत्त्वाचे माध्यम म्हणजे 'संवाद'. मुलांशी मोकळ्यामनाने संवाद साधला तर त्यांच्या मनातील ताण कमी होण्यास मदत होईल.पालक-पाल्य, शिक्षक - विद्यार्थी यांच्यात एक सुंदर नाते निर्माण होईल हा विश्वास या कार्यशाळेत व्यक्त करण्यात आला.कार्यशाळेत लैंगिक शोषण, स्पर्श, पालकत्वाचे प्रकार, तणावाचे प्रकार यावरही चर्चा झाली. पालकांनी, शिक्षकानी आपापल्या भूमिकतून बाहेर पडून संवादकाची भूमिका स्विकारायला हवी. असे ठामपणे बोलले गेले. वैज्ञानिक, प्रगतीशील दृष्टीकोन आणि पारदर्शी असणाऱ्या व्यक्तीशी मुले अधिक मोकळेपणाने संवाद साधू शकतात. आरोग्यभान संस्थेचे डॉ. मोहन देस, श्रुती भिडे, रेणुका कल्पना,माणिकदादा पारधे यांनी संवादक या नात्याने विद्यार्थी, पालक शिक्षक यांच्या मनातील बरेचसे गोंधळ दूर दूर केले.

कार्यशाळेच्या आयोजनाबद्दल विद्यालयाचे संस्था अध्यक्ष डॉ. चेतन सारडा, उपाध्यक्ष विवेक रेड्डी, सचिव कमलकिशोर अग्रवाल, शालेय शिक्षण समितीचे अध्यक्ष अतुल देऊळगावकर यांनी समाधान व्यक्त केले

संक्षिप्त...

पावसाळी साहित्याला मागणी वाढली



तभा वृत्तसेवा

लातूर दि. २९ जून : पावसाळा सुरू होवून जवळपास महिना संपत आला.

परंतू पाऊस पडला नसल्याने छत्री, रेनकोट, या पावसाळी साहित्यांना मागणी नव्हती मात्र गेल्या दोन-तीन दिवसांपासून बऱ्यांपैकी पाऊस पडत असल्याने पावसाळी साहित्यांना मागणी वाढली आहे. त्यामुळे या साहित्यांनी विक्री करणाऱ्या व्यापाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. शहरातील महात्मा गांधी चौकातील जुने रेल्वे स्थानक प्रवेश द्वार परिसरात पावसाळी साहित्याचे विक्रीचे स्टॉल मोठ्या प्रमाणात लावण्यात आले आहेत. तसेच शहरातील गंजगोलाई, कापड लाईन परिसरातही या साहित्यांची विक्री होत आहे.

लातूरच्या विकासासाठी अनुभवी नेतृत्वाची गरज; संभाजीराव पाटील निलंगेकर यांना मंत्रिमंडळात संधी मिळणार का?



तभा वृत्तसेवा

निलंगा दि. २९ जून : महाराष्ट्रात राजकीय घडामोडी होऊन ऑपरेशन टायगर यशस्वी झाल्यानंतर केंद्रासह राज्यातील मंत्रिमंडळाच्या संभाव्य विस्ताराची चर्चा सुरू असून या पार्श्वभूमीवर माजी मंत्री तथा निलंगा मतदारसंघाचे आमदार संभाजीराव पाटील निलंगेकर यांचे नाव पुन्हा एकदा राजकीय चर्चेच्या केंद्रस्थानी आले आहे. गेल्या दोन दशकांहून अधिक काळ भारतीय जनता पक्षाच्या संघटनात्मक बळकटीसाठी त्यांनी केलेले सातत्यपूर्ण कार्य, लातूर जिल्ह्यात पक्षाची उभारणी, विकासाभिमुख प्रशासनातील अनुभव आणि जनतेशी असलेला कायमस्वरूपी संवाद यामुळे त्यांना पुन्हा मंत्रिमंडळात स्थान मिळावे, अशी चर्चा राजकीय वर्तुळात व्यक्त होत आहे.

संघर्षातून स्वतःचे नेतृत्व घडविणाऱ्या संभाजीराव पाटील निलंगेकर यांनी कोणत्याही राजकीय शॉर्टकटचा अवलंब न करता जनसंपर्क, संघटन आणि लोकसेवेच्या बळावर निलंगा मतदारसंघात भक्कम जनाधार निर्माण केला. सलग चार वेळा आमदार म्हणून निवडून येत त्यांनी मतदारांचा विश्वास सार्थ ठरविला आहे.

भारतीय जनता पक्षाच्या संघटनात्मक विस्तारात त्यांचे योगदान विशेष उल्लेखनीय मानले जाते. एकेकाळी काँग्रेसचा बालेकिल्ला समजल्या जाणाऱ्या लातूर जिल्ह्यात भाजपची मुळे गावागावांत रुजविणे, स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये पक्षाचे संघटन मजबूत करणे आणि भाजपला सक्षम पर्याय म्हणून उभे करणे, या प्रक्रियेत त्यांनी प्रभावी नेतृत्व केले.

महाराष्ट्र भाजयुमोचे अध्यक्ष, भाजपचे प्रदेश महामंत्री आणि नंतर राज्याचे मंत्री या विविध जबाबदाऱ्या यशस्वीपणे सांभाळताना त्यांनी संघटन आणि प्रशासन या दोन्ही क्षेत्रांत स्वतंत्र ठसा उमटविला. लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून त्यांच्या कार्यकाळात अनेक महत्त्वाकांक्षी विकासकामांना गती मिळाली.

रेल्वे बोगी निर्मिती कारखान्याचा मार्ग मोकळा करणे, राष्ट्रीय महामार्गांच्या विकासाला चालना देणे, जलयुक्त शिवार अभियान प्रभावीपणे राबविणे, जलसंधारणाच्या कामांना वेग देणे तसेच निलंगा शहराला 'क' वर्ग नगरपालिकांमध्ये प्रथमच २४ तास पाणीपुरवठा योजनेचा मान मिळवून देण्यात त्यांची महत्त्वपूर्ण भूमिका राहिली.

राजकीय संघटनाच्या दृष्टीनेही त्यांची कामगिरी विशेष लक्षवेधी ठरली. लातूर जिल्ह्यात एकेकाळी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये भाजपचे अस्तित्व अत्यंत मर्यादित असताना त्यांनी पक्ष संघटना मजबूत केली. नगरपालिका, पंचायत समित्या आणि इतर स्थानिक संस्थांमध्ये भाजपला यश मिळवून देत जिल्ह्याच्या राजकारणात पक्षाला भक्कम स्थान मिळवून दिले. विशेष म्हणजे, लातूर जिल्ह्याच्या इतिहासात प्रथमच जिल्हा परिषद भाजपच्या ताब्यात आणत शेतकरी नेतृत्वाला संधी देऊन मिलिंद लातुरे यांची जिल्हा परिषद अध्यक्षपदी निवड घडवून आणली. तसेच लातूर महानगरपालिकेत प्रथमच भाजपची सत्ता स्थापन करण्यातही त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

त्यांच्या कार्यकाळात जिल्ह्यात सांस्कृतिक सभागृहे, शादीखाने, विविध समाजांसाठी सामुदायिक सुविधा, रस्ते, पाणीपुरवठा, नागरी विकास आणि ग्रामीण पायाभूत सुविधांच्या अनेक योजनांची प्रभावी अंमलबजावणी झाली. त्यामुळे विकासाभिमुख आणि सर्वसमावेशक नेतृत्व अशी त्यांची ओळख निर्माण झाली.

शेती आणि ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत करण्यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले. तब्बल अकरा वर्षे बंद असलेला अंबुलगा सहकारी साखर कारखाना पुन्हा सुरू करून हजारो ऊस उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा दिला. इथेनॉल आणि सीएनजी प्रकल्पांच्या माध्यमातून ग्रामीण भागात रोजगारनिर्मिती, उद्योगविकास आणि कृषीपूरक अर्थव्यवस्थेला चालना देण्याचा प्रयत्न त्यांनी केला.

राज्याच्या विकासात मराठवाड्याचा वाटा अधिक मजबूत करण्यासाठी अनुभवी, अभ्यासू आणि विकासाभिमुख नेतृत्वाची आवश्यकता असल्याचे मत अनेक स्तरांतून व्यक्त होत आहे. संघटन कौशल्य, प्रशासनाचा अनुभव, विकासकामांतील सातत्य आणि जनतेशी असलेला दृढ संवाद या सर्व बाबींचा विचार करता संभाजीराव पाटील निलंगेकर यांना मंत्रिमंडळात पुन्हा संधी मिळाल्यास लातूर जिल्ह्यासह संपूर्ण मराठवाड्याच्या विकासाला नवसंजीवनी मिळू शकते, अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.

श्री प्रेमनाथ विद्यालयात पालक मेळावा खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न



तभा वृत्तसेवा

शिरूर अनंतपाळ दि. २९ जून : तालुक्यातील मौजे थेरगाव येथे आज दि.२९/६/२०२६ रोजी पालक मेळावा संपन्न झाला.बहुसंख्येने उपस्थित महिला, पुरुष पालकांना शाळेचे मुख्याध्यापक संजय बेल्लेवाड सरांनी गुलाब पुष्प देऊन स्वागत केले.

आणि कार्यक्रमाला सुरुवात करुन प्रथम पालकांना बोलण्याची संधी दिली व त्यांच्या समस्या जाणून घेतल्या व त्या समस्याचे निराकरण करून घेण्याचे संस्थाध्यक्ष एस आर शिंदे व सचिव बि डी पेठे यांनी संस्थेच्या वतीने सांगीतले .

पालकांनी दररोज शाळेत येऊन आपल्या पाल्याचा अभ्यास पहावा असे एक आर कसपटे सरांनी सांगितले

पालक मेळाव्यामध्ये पालकांनी काही समस्या मांडल्या व त्या समस्यांची शिक्षक मुख्याध्यापक व संस्थेचे सदस्य सचिव अध्यक्ष यांनी निराकरण केले.

पवार सरांनी शिक्षकांच्या समस्या सर्व पालकांना समजून सांगितले

कार्यक्रमाचे अध्यक्ष बि डी पेठे सर यांनी अध्यक्षीय समारोपात आपले मत व्यक्त करताना काही पालकांच्या प्रश्नांची सोडवणूक करताना म्हणाले की शिक्षक भरती ही पोर्टल द्वारे होत असल्यामुळे ही समस्या थोड्या दिवसांमध्ये सुटेल तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी. शाळा संस्था आणि पालक यांच्या समन्वयातून विद्यार्थ्यांचा विकास व्हावा ही अपेक्षा व्यक्त केली.

तसेच पालकांच्या समस्या पुढील पालक मेळाव्यामध्ये दुरुस्ती झालेल्या दिसून येतील असे आश्वासन दिले. व पालकांची संख्या बघून आनंद व्यक्त केला.

ए आर कसपटे सर यांनी पालक व पाल्य यांच्या विषयी मार्गदर्शन केले व त्यांच्या काही समस्या असलेल्या त्यांनी लगेच तिथेच निराकरण केले.या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे संस्थेचे अध्यक्ष एस आर शिंदे, सचिव डी पेठे, उपाध्यक्ष एन आर शिंदे, पत्रकार शंकर मिटकर, केशव भांगे, रविकिरण सुर्यवंशी, पवार सर,चिमणशेटे,सगर,सदानंदे, सचिन नाब्दे, माडे, हे उपस्थित होते. सुत्रसंचलन कसपटे सरांनी केले तर मुख्याध्यापक बेल्लेवाड सरांनी सर्वांचे आभार मानून कार्यक्रम संपला असे जाहीर केले.

अध्यात्मिक विश्वविद्यालय तर्फे गीता का भगवान कौन? या विषयावर जनजागरण अभियान



तभा वृत्तसेवा

निलंगा:- भगवत गीतेचा सखोल अभ्यास, शास्त्रीय शोध व निःपक्षपातीपणे चर्चा करून समाजासमोर भगवत गीतेचा मूळ स्वरूप व अध्यात्मिक सार मांडण्याच्या उद्देशाने अध्यात्मिक विश्व विद्यालयाच्या वतीने गीता का भगवान कौन? या विषयावर आध्यात्मिक व शास्त्रीय पद्धतीने देशव्यापी जनजागरण अभियान राबविण्यात येत असल्याची माहिती ॲड. अमोल कोकणे यांनी दिली.

निलंगा येथील अध्यात्मिक विश्वविद्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. भगवद्गीतेतील परमेश्वराचे स्वरूप हे भगवान श्रीकृष्ण नसून भगवान शंकर आहेत, असा दावा दिल्ली उच्च न्यायालयातील ॲड. अमोल कोकणे यांनी यावेळी केले..

ॲड. कोकणे म्हणाले, भगवान श्रीकृष्ण शिवलिंगाची पूजा करताना दिसतात. सर्व देवांचे देव महादेव असून, परमेश्वराचे सर्व गुण भगवान शंकरांमध्येच प्रकट होतात. भगवद्गीतेचा सखोल अभ्यास, शास्त्रीय संशोधन आणि विचारमंथनाच्या आधारे हा निष्कर्ष समाजासमोर मांडला जात आहे. या निष्कर्षाच्या जनजागृतीसाठी देशभर अभियान राबविण्यात येत आहे त्यांनी सांगितले की, विविध संस्थांतील विद्वान, संशोधक, अध्यात्मिक जिज्ञासू आणि शास्त्रज्ञ यांच्या सहभागातून शास्त्राधारित अभ्यास करण्यात आला आहे.

भगवद्गीतेनुसार अजन्मा, अविनाशी, अगर्भा, त्रिकालदर्शी, आदीदेव , अव्यक्त मूर्ती, संहारकर्ता आणि महाकाल हे गुण परमेश्वराचे असून आध्यात्मिक व शास्त्रीय विश्लेषणानुसार हे सर्व गुण भगवान शिवशंकर भोलेनाथ मध्ये दिसून येतात भगवान शंकर हे ज्योतिर्मय आणि सूक्ष्म स्वरूपाचे असल्याचे गीतेत वर्णन असल्याचा दावा त्यांनी केला.

अर्जुनाला जे विराट स्वरूप दिसले, ते भगवान शंकरांचेच होते. मात्र, नंतरच्या काळात काही विद्वानांनी तेथे श्रीकृष्णांचे नाव समाविष्ट केल्याचा दावा त्यांनी केला. त्यामुळे गीतेचे मूळ स्वरूप समाजासमोर आणणे आवश्यक असल्याचे ते म्हणाले.

धर्म, भाषा आणि जातीच्या नावावर होणारे वाद टाळण्यासाठी भगवान शंकरांच्या सार्वत्रिक स्वरूपाचा स्वीकार समाजाने करावा, असे आवाहन त्यांनी केले. सर्व धर्म आणि सर्व जाती भगवान शंकरांचे अस्तित्व मान्य करतात, त्यांचे ध्यान व पूजन करतात, असेही त्यांनी नमूद केले.

आद्यदेव भगवान शंकर असल्याचे शास्त्रसंमत असल्याचा दावा करत, ईश्वरी ज्ञानाचा प्रसार आणि मानवसमाजाची अध्यात्मिक सेवा हेच विश्वशांती प्रस्थापित करण्याचे प्रभावी साधन असल्याचे ड. कोकणे यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

या पत्रकार परिषदेस कार्यक्रमाचे आयोजक कल्लाप्पा बिराजदार यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

निलंगा बस स्थानकात 'राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहीम' उत्साहात संपन्न



तभा वृत्तसेवा

निलंगा दि. २९ जून : जागतिक आरोग्य संघटनेच्या पोलिओ निर्मूलन मोहिमेचा एक भाग म्हणून, आज २८ जून २०२६ रोजी निलंगा बस स्थानक परिसरात 'राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहीम' यशस्वीरीत्या राबविण्यात आली. या मोहिमेअंतर्गत ५ वर्षांखालील बालकांना पोलिओ प्रतिबंधक डोस देण्यात आला.

निलंगा येथील उपजिल्हा रुग्णालयाच्या आरोग्य पथकाने या मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदविला. याप्रसंगी उपजिल्हा रुग्णालयातील औषध निर्माता मनोज बरमदे, प्रयोगशाळा सहाय्यक नितीन कांबळे आणि आरोग्यसेविका मीनाताई उसनाळे यांनी विशेष परिश्रम घेतले.

भारत सरकारने १९९५ पासून दरवर्षी ही मोहीम राबविण्यास सुरुवात केली असून, भारताला २०१४ मध्ये पोलिओमुक्त देशाचे अधिकृत प्रमाणपत्र मिळाले आहे. ही स्थिती टिकवून ठेवण्यासाठी आणि ५ वर्षांखालील प्रत्येक बालकाला सुरक्षित ठेवण्यासाठी आरोग्य विभाग सातत्याने प्रयत्नशील आहे.

जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय, लातूर यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबविण्यात आली असून, ग्रामीण भागात ३ दिवस तर शहरी भागात ५ दिवस 'घरभेटी' पद्धतीने लसीकरण पूर्ण करण्याचे नियोजन आरोग्य विभागाने केले आहे. याद्वारे दुर्गम भाग, झोपडपट्ट्या, विटभट्ट्या आणि स्थलांतरित वस्त्यांवरील बालकांपर्यंत पोहोचून १००% लसीकरण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

मोहिमेच्या दिवशी बुथवर डोस न मिळालेल्या बालकांसाठी आरोग्य सेवकांमार्फत पुढील काही दिवस घरभेटीद्वारे लसीकरण केले जाणार आहे, तरी पालकांनी आपल्या बालकांना पोलिओ डोस आवर्जून द्यावा, असे आवाहन आरोग्य विभागातर्फे करण्यात आले आहे.

लॉर्ड श्रीकृष्ण इंग्लिश स्कूल मध्ये वट पौर्णिमा साजरी



तभा वृत्तसेवा

लातूर दि. २९ जून : मातोश्री कलावती प्रतिष्ठाण संचलीत लातूर परिसरातील लॉर्ड श्रीकृष्ण इंग्लिश स्कूल मध्ये वट पौर्णिमा मोठ्या उस्ताहात साजरी करण्यात आली. सर्वप्रथम संस्थेचे अध्यक्ष श्रीकृष्ण लाटे, शाळेच्या प्राचार्या रुपाली कुलकर्णी, शाळेचे समन्वयक रौफ शेख, समन्वयिका संगीता शेटे, रुपाली कोकेटे, नम्रता झांबरे, विद्या पाटील यांनी वडाच्या झाडाचे पूजन केले.

या कार्यक्रमाची सुरवात शाळेच्या समन्वयिका नम्रता झांबरे यांनी वट पौर्णिमा याविषयी माहिती दिली. वट पौर्णिमाचे महत्व काय आहे. सर्व विद्यार्थ्यांना वडाच्या झाडाचे अनन्य साधारण महत्व समजवून सांगितले.

यावेळी शाळेच्या सर्व विद्यार्थ्यांना वट पौर्णिमेच्या शुभेच्छा देण्यात आल्या.

याप्रसंगी शाळेचे शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन शाळेच्या शिक्षिका दीक्षा गिरी यांनी केले.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी प्रयत्न केले.

रूद्रेश्वर मंदिरात पोलीओ लसीकरणास प्रतिसाद



तभा वृत्तसेवा

लातूर येथील एलआयसी कॉलनीतील रुद्रेश्वर मंदिर येथे लसीकरण मोहीम उत्साहात राबविण्यात आली. यावेळी बुथप्रमुखबालिका राठोड, लसपाजकगणेश कचरे,आशा सेविका मीनाक्षी काळे यांची उपस्थिती होती. हा उपक्रम लातूर शहर महानगरपालिकेच्या युपीएचसीगौतम नगर अंतर्गत राबविण्यात आला. या लसीकरण मोहीमेस उत्तम प्रतिसाद मिळाला.

लातूर कॉलेज ऑफ फार्मसीने निकालाची परंपरा राखली













तभा वृत्तसेवा

औसा दि. २९ जून : स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड अंतर्गत घेण्यात आलेल्या पदवी उन्हाळी परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून तालुक्यातील हासेगाव येथील श्री वेताळेश्वर शिक्षण संस्था संचलित लातूर कॉलेज ऑफ फार्मसी महाविद्यालयाने यावर्षीही उज्ज्वल निकालाची परंपरा कायम राखली आहे.

या वर्षी महाविद्यालयातील अनेक विद्यार्थी विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाले आहेत. अंतिम वर्षाच्या निकालात आयेशा अयुब शेख हिने ७६.६४ टक्के गुणांसह प्रथम, गणेश सुभाष गावकरे यांनी ७४.६९ टक्के गुणांसह द्वितीय, तर सानिया नवाजसाब शेख हिने ७४.२३ टक्के गुणांसह तृतीय क्रमांक पटकावला आहे. तृतीय वर्षाच्या निकालात कृष्णा परमेश्वर भाले यांनी सीजीपए ७.८२ आणि संकेत विनायक चव्हाण यांनी सीजीपीए ७.८२ सह प्रथम, वैभवी विठ्ठल मुक्तापुरे हिने सीजीपीए ७.७५ द्वितीय वैष्णवी तुकाराम येडले हिने सीजीपीए ७.६४ सह तृतीय क्रमांक विशेष प्राविण्य मिळविले आहे. द्वितीय वर्षाच्या निकालात टरके श्रद्धा एम. ट्रक हिने सीजीपीए ८.३५ सह प्रथम, श्रद्धा सी.माने हिने सीजीपीए ८.१२ द्वितीय, तर निकिता डी. टरके हिने सीजीपीए ८ सह तृतीय क्रमांक मिळविला आहे.

या गुणवंत विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष भीमाशंकर बावगे,सचिव वेताळेश्वर बावगे, संचालक नंदकिशोर बावगे, संचालिका डॉ. माधुरी बावगे, प्राचार्य डॉ. नितीन लोणीकर, तसेच परीक्षा प्रमुख प्रा. योगेश हरंगुळे, प्रा. दीपक जोशी, प्रा. डॉ. गणेश बनसोडे, प्रा. डॉ. धनराज वसमते, प्रा. स्नेहा वैरागकर तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/

मंगळवार, ३० जून २०२६

बीड जिल्हा ग्राहक संरक्षण परिषद गठित करण्यास प्रशासनाचा विसर : अनिल बोर्डे

3 वर्षापासून मुदत संपली, ग्राहकाचे प्रश्न प्रलंबित



गेवराई (प्रतिनिधी) : बीड जिल्हा ग्राहक संरक्षण परिषद गठित करण्यास जिल्हा प्रशासन विसरले असल्याचे निदर्शनास येत आहे. परिषदेची मुद्दत संपून तीन वर्षाचा कालावधी उलटला असूनही देखील अद्याप पर्यंत नवीन परिषद स्थापन किंवा गठीत झालेली नाही. असे बीड जिल्हा ग्राहक पंचायत महाराष्ट्र चे जिल्हा उपाध्यक्ष अनिल बोर्डे यांनी या पत्रकाद्वारे प्रसिद्ध केले आहे.

ग्राहक पंचायतीने याबाबत जिल्हा प्रशासनाला व यांना वारंवार पत्रव्यवहार,स्मरणपत्रे दिली आहेत. मात्र त्यावर कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. त्यामुळे बीड जिल्ह्यातील ग्राहकाच्या तक्रारी, फसवणूक, निकृष्ट सेवा व वस्तू व इतर ग्राहकाचे व इतर शेतकरी ग्राहकाचे खते बी बियाणे याबाबतचे प्रश्न प्रलंबित राहत आहेत. ग्राहकांना न्याय मिळवून देणारी यंत्रणा नसल्याने ग्राहकाचे,नागरिकाचे मोठे नुकसान होत आहे. प्रशासन याप्रकरणी गंभीर पणे विचार विनिमय होत नसल्याचेऋ निदर्शनास आले आहे. " ग्राहक संरक्षण कायदा 2019 नुसार प्रत्येक जिल्ह्यात ग्राहक संरक्षण परिषद असणे बंधनकारक आहे व ग्राहक हितासाठी असणे अत्यंत आवश्यक आहे. प्रशासनाने याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले आहे. तरी तात्काळ ग्राहक संरक्षण परिषद गठित करून ग्राहकांना न्याय मिळवून द्यावा अशी मागणी बीड जिल्हा ग्राहक पंचायत महाराष्ट्र चे जिल्हा उपाध्यक्ष अनिल बोर्डे यांनी या पत्रकाद्वारे केलेली आहे.

रोटरीचे एन.आय.सी.यू. चिमुकल्यांसाठी देवदूतांचे कार्य करील - जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन

लोखंडी सावरगावच्या स्त्रीरुग्णालयात नवजात शिशु अतिदक्षता कक्षाचे लोकार्पण

अंबाजोगाई : रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटीने लोखंडी सावरगाव येथील स्त्री रुग्णालयास दिलेला नवजात शिशु अतिदक्षता कक्ष देवदूतांचे कार्य करील. असे प्रतिपादन बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी केले.

रोटरी ग्लोबल ग्रॅन्ट अंतर्गत, रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी, रोटरी क्लब नोवी यू.एस.ए, टी.बी. लुल्ला चॅरिटेबल फाउंडेशन व पालव यांच्या संयुक्त विद्यमाने स्त्री रुग्णालय, लोखंडी सावरगाव येथे उभारण्यात आलेल्या नवजात शिशु अतिदक्षता कक्ष (NICU) चा लोकार्पण सोहळा शनिवारी सायंकाळी पार पडला. या कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन बोलत होते.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रोटरीचे प्रांतपाल सुधीर लातुरे, रोटरीच्या ग्लोबल ग्रॅण्ट समन्वयक स्वाती हेरकळ, आ. नमिता मुंदडा,जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सतीशकुमार सोळंके, प्रशिक्षणार्थी जिल्हाधिकारी दिव्यांग गुप्ता,भावी प्रांतपाल जयेश पटेल,माजी प्रांतपाल हरीश मोटवानी, उपप्रांतपाल प्रविण देशपांडे,

रोटरी क्लबच्या अध्यक्षा प्रा.रोहिणी पाठक, सचिव मंजुषा जोशी,उपाध्यक्ष धनराज सोळंकी,स्त्री रुग्णालयाचे अधीक्षक डॉ.चंद्रकांत चव्हाण,बालरोग तज्ञ डॉ. रत्नाकर तांदळे उपस्थित होते.

यावेळी बोलताना जिल्हाधिकारी जॉन्सन म्हणाले की आरोग्य व शिक्षण व्यवस्था बळकट झाली तरच खऱ्या अर्थाने राष्ट्र पुढे जाईल. शिक्षण व आरोग्य व्यवस्थेत राजकारण नको. नवीन पिढीचे भवितव्य या दोन बाबींवरच अवलंबून असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी त्यांनी रोटरीच्या कार्याचा गौरव केला. या वेळी बोलताना स्वाती हेरकळ म्हणाल्या की समाजाचे ऋण फेडण्यासाठी आपण कांहीतरी केले पाहिजे. या उद्देशाने या एन.आय.सी.यू. ची उभारणी झाली. आगामी काळातही आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यासाठी रोटरी कटिबद्ध असल्याचे त्या म्हणाल्या. यावेळी बोलताना आ.नमिता मुंदडा म्हणाल्या की या रुग्णालयाला सर्व सेवा सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आपण सर्वोतोपरी मदतीचे आश्वासन दिले.तसेच रोटरीने हा प्रकल्प उभारल्या बद्दल त्यांचे आभार मानले.

अध्यक्षीय समारोपात सुधीर लातुरे यांनी रोटरी उपेक्षितांसाठी सातत्याने कार्य करीत असल्याचे सांगत या परिसरातील गरजा व प्रश्न सोडविण्यासाठी काम करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.सतीशकुमार सोळंके,अधीक्षक डॉ.चंद्रकांत चव्हाण यांनी रुग्णालयास आवश्यक त्या सेवा ,सुविधा व कर्मचारी वर्ग उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे सांगितले.

यावेळी फित कापून व धन्वंतरी पूजनाने नवजात शिशु अतिदक्षता कक्षाचे लोकार्पण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक रोटरी क्लबच्या अध्यक्षा प्रा.रोहिणी पाठक यांनी केले. संचलन डॉ. प्रिया तिडके,प्रा.वसुधा गडसिंग यांनी केले. तर उपस्थितांचे आभार धनराज सोळंकी यांनी मानले. या कार्यक्रमास रोटरीचे प्रांतातील पदाधिकारी,सदस्य, रुग्णालयातील डॉक्टर,परिचारिका, व कर्मचारी उपस्थित होते.

ज्येष्ठ शुद्ध पौर्णिमेनिमित्त श्री दत्त संस्थान, बालाघाट येथे 29 जून रोजी भव्य उत्सव सोहळ्याचे आयोजन

मांजरसुंबा | प्रतिनिधी : बीड तालुक्यातील कपिलधारवाडी (मांजरसुंबा) येथील श्री दत्त संस्थान, बालाघाट येथे ज्येष्ठ शुद्ध पौर्णिमेनिमित्त सोमवार, दि. २९ जून २०२६ रोजी भव्य धार्मिक उत्सव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. प.पू. ष.ब्र. श्री १०८ शिवानंद शिवाचार्य महाराज (तमलुरकर) यांच्या कृपाशीर्वादाने तसेच दत्त उपासक वैजिनाथ महाराज शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उत्सव भक्तिमय वातावरणात संपन्न होणार आहे.

ज्येष्ठ शुद्ध पौर्णिमा हा दत्तभक्तांसाठी अत्यंत पवित्र दिवस मानला जातो. या निमित्ताने श्री दत्त संस्थान परिसरात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, श्री दत्त प्रभूंची विशेष पूजा, अभिषेक, आरती, नामस्मरण, तसेच महाप्रसादाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या दिवशी परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण होणार असून, पंचक्रोशीतील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहतील, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

या उत्सवासाठी अन्नदाते म्हणून अजब श्रीकृष्ण उद्धवराव (न्यू आनंद किराणा स्टोअर्स, मांजरसुंबा) तसेच रमेश जगदाळे (महाजनवाडी) यांनी सहकार्य केले आहे. त्यांच्या योगदानामुळे भाविकांसाठी महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली आहे. उत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी अमोल शिंदे, गणेश शिंदे व समस्त दत्त भक्त परिवार परिश्रम घेत असून, पंचक्रोशीतील सर्व भाविकांनी या पवित्र सोहळ्यास उपस्थित राहून श्री दत्त प्रभूंचे दर्शन घ्यावे, पूजा-अर्चा करावी आणि महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे नम्र आवाहन श्री दत्त संस्थान, बालाघाट यांच्या वतीने करण्यात आले आहे.

'मेरी बात' कार्यक्रमात प्रभावती अवचर यांचे प्रेरणादायी मनोगत; शिस्त, संस्कार व मानवता हीच जीवनमूल्ये असल्याचा संदेश

अंबाजोगाई : आंतरभारती, अंबाजोगाईच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'मेरी बात' या आगळ्यावेगळ्या उपक्रमात शिक्षिका तथा आंतरभारती सदस्य प्रभावती अवचर यांनी आपल्या जीवनातील अनुभव, शैक्षणिक कार्य आणि सामाजिक मूल्यांवर आधारित प्रेरणादायी मनोगत व्यक्त केले.

बालक मंदिर येथे संपन्न झालेल्या या कार्यक्रमात बोलताना त्यांनी शिस्त, संस्कार आणि मानवता हीच मानवी जीवनाची खरी मूल्ये असून प्रत्येकाने आपल्या जीवनात या गुणांचा अंगीकार करणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले. कुटुंब, समाज आणि शिक्षण व्यवस्थेमध्ये नैतिक मूल्यांचे संवर्धन झाले तरच सुदृढ समाजाची निर्मिती होऊ शकते, असेही त्यांनी सांगितले.

आपल्या शैक्षणिक आणि सामाजिक कार्याचा आढावा घेताना त्यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली. शिक्षक म्हणून कार्य करत असताना विद्यार्थ्यांमध्ये वाचन संस्कृती, सामाजिक बांधिलकी आणि मानवतेची भावना रुजविण्यासाठी सातत्याने प्रयत्न केल्याचे त्यांनी नमूद केले.

यावेळी उपस्थित श्रोत्यांनी त्यांच्या अनुभवांना आणि विचारांना उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कार्यक्रमामुळे उपस्थितांना जीवनमूल्ये जपण्याची आणि सामाजिक उत्तरदायित्वाची नवी प्रेरणा मिळाल्याची भावना व्यक्त करण्यात आली.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी आंतरभारतीच्या पदाधिकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. उपस्थितांनी प्रभावती अवचर यांच्या विचारांचे कौतुक करून अशा उपक्रमांची गरज अधोरेखित केली.

या कार्यक्रमासाठी आंतरभारतीचे राष्ट्रीय मार्गदर्शक अमर हबीब, आंतरभारती अंबाजोगाई च्या अध्यक्ष शैलजा बरुरे, कोशाध्यक्ष महावीर भगरे, यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन व्यंकटेश जोशी यांनी केले.

तुलसी फॅशन डिझाईन कॉलेजमध्ये 'नशा मुक्त भारत अभियान' उत्साहात

विद्यार्थिनींना व्यसनमुक्तीची शपथ ; पोस्टर पेंटिंग स्पर्धेत शिवानी कुरे प्रथम

बीड (प्रतिनिधी) :देवगिरी प्रतिष्ठान संचलित तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन, बीड येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने गुरुवार, २५ रोजी 'नशा मुक्त भारत अभियान' अत्यंत उत्साहात राबविण्यात आले. या अभियानांतर्गत महाविद्यालयात विविध प्रबोधनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

याप्रसंगी उपस्थित प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थिनींना 'नशा मुक्त भारत' घडवण्याची तसेच



व्यसनाधीनतेपासून दूर राहण्याची शपथ देण्यात आली. अभियानाचे औचित्य साधून विद्यार्थिनींसाठी एक विशेष 'पोस्टर पेंटिंग स्पर्धा' देखील आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत शिवानी कुरे हिने प्रथम, सीमा प्रजापती हिने द्वितीय, तर आकांक्षा घोडके हिने तृतीय क्रमांक पटकावला.

कार्यक्रमादरम्यान महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. अश्विनी बेंद्रे, प्रा. सय्यद शहाना, प्रा. विद्या उघडे व प्रा. गीतांजली कांबळे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. समाजात व्यसनमुक्तीचा संदेश पोहोचवण्यासाठी विद्यार्थिनींनी नेहमी पुढाकार घ्यावा, असे आवाहन त्यांनी आपल्या मार्गदर्शनातून केले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.रुशाली लोखंडे, सूत्रसंचालन शिवानी कुरे तर, आभार श्वेता लाड हिने मानले. यावेळी रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.श्वेता वंजारे यांच्यासह महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

शिक्षीका सिती मोटे सेवानिवृत्त



बीड -: तालुक्यातील नवगण राजूरी जिल्हा परिषद शाळेच्या शिक्षीका सिता संताराम मोटे वाघ या आज सेवानिवृत्त होत आहेत. त्याच्या नोकरीच्या काळात त्यांना अनेक सामाजिक संस्थांनी आदश शिक्षीका म्हणून गौरवण्यात आले आहे .

1989 साली पहिला नियुक्ती आदेश पोत्रा हायस्कूल येथील, नंतर 1993 साली केंद्रीय प्राथमिक शाळा जेबापिंप्री येथे बदली झाली, 1998 साली पिंपळनेर येथे बदली झाली, 2011-2012 अशी दोन वर्षे माजलगाव येथे नोकरी, 2013 ला गेवराई तालुक्यातील कुंभारवाडी येथे बदली झाली तिथे 5 वर्षे, 2018 पासून ते आजपर्यंत नवगण राजुरी येथे 8 वर्ष अशा सर्व ठिकाणी मिळून 37 वर्षांचा सेवाकाल पूर्ण केला. सेवानिवृत्त होत असल्याने आज त्यांचा शाळेच्या वतीने निरोप समारंभ आयोजित करण्यात आलाआहे गजानन कारखान्याचे तत्कालीन चेअरमन रविद क्षीरसागर यांच्या अध्यक्षतेखालील व शिक्षण आधीकारी यांच्या उपस्थितीत निरोप समारंभ पार पडणार आहे .खडकी घाट येथील सेवानिवृत्त शिक्षक सुखदेव वाघ यांच्या त्या सौभाग्यवती आहेत.

स्कूल बसचा निष्काळजीपणा आणि शालेय व्यवस्थापनाचे चूकीचे नियोजन जीवावर बेतले ; गयानगर येथे विद्यार्थीनीला जोराची धडक

बीड । प्रतिनिधी : बीड शहरातील गयानगर परिसरात शनिवारी स्कूल बसच्या निष्काळजीपणामुळे अभिज्ञा अभिजित माडीवाले (9) रा.गयानगर, बीड ता.जि. बीड या विद्यार्थीनीला शाळेच्या बसमधून उतरल्यानंतर रस्ता ओलांडतांना अज्ञात वाहनाने जोराची धडक दिल्याने तिला जबर मुका मार लागून ती जखमी झाली त्यानंतर तिला उपचाराकामी चिंतामण हॉस्पीटल येथे दाखल करण्यात आले. घटनेची माहिती मिळताच जिल्हा वाहतूक शाखेचे प्रभारी पोलीस निरीक्षक वैभव पाटील हे सुट्टीवर असतांना देखील त्यांनी पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर यांना तातडीने घटनास्थळी जाण्यासाठी सांगताच विजय जाधवर सोबत पोलीस अंमलदार राहुल घाडगे, पोलीस हवालदार फुलचंद जाधव आणि चालक दत्ता कदम यांनी चिंतामण हॉस्पीटल येथे तात्काळ धाव घेत परिस्थितीची पाहणी केली.

या घटनेची गंभीर दखल घेत जिल्हा वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक वैभव पाटील यांनी बीडमधील सर्व शाळांना आता पत्रव्यवहार करुन बसचालकांना तसेच बसमध्ये असलेले इतर कर्मचारी यांना त्यांनी स्वतः बस थांबवून विद्यार्थ्यांना रस्ता ओलांडून घरापर्यंत सुखरुप जाईपर्यंतची जबाबदारी घ्यावी असे लेखी पत्र काढणार असल्याची माहिती दिली.

विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने शाळा प्रशासन, बसचालक यांनी अधिक दक्षता घेणे आवश्यक असून, नियमांचे पालन न करणार्यांविरुद्ध आवश्यक ती कारवाई करण्यात येईल, असा इशाराही पोलीस निरीक्षक वैभव पाटील यांनी दिला. तसेच वाहनचालकांनी देखील वाहने चालवतांना वेगावर नियंत्रण ठेवावा असे आवाहन पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर यांनी केले आहे.

फक्त माहिती अधिकार कायद्यालाच कार्यकर्ते आहेत - नवे नियम मागे घ्या : ॲड. अजित देशमुख



बीड (प्रतिनिधी) : माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा आल्यानंतर या कायद्याने देशभरात क्रांती घडवली. यापूर्वी हजारो कायदे आले. मात्र कोणत्याही कायद्याला कार्यकर्ता नव्हता. माहिती अधिकार असा एकमेव कायदा आहे की, ज्या कायद्याला कार्यकर्ते आहेत. आणि म्हणूनच या कार्यकर्त्यांना "आर.टी.आय. कार्यकर्ता" म्हणून संबोधले जाते. त्यामुळे यातील वादग्रस्त दुरुस्त्या आणि नवा अधिनियम तात्काळ रद्द करावा, अशी मागणी जन आंदोलनाचे विश्वस्त तथा स्वराज्य जनजागृती परिषदेचे अध्यक्ष ॲड. अजित एम. देशमुख यांनी केली आहे. माहिती अधिकार कायदा हा अत्यंत चांगला कायदा आहे. या कायद्यामध्ये अनेक चांगल्या तरतुदी असून त्याचा पुरेपूर वापर जनतेने केला आहे. त्यामुळे शासनाचा अनेक विभागातील भ्रष्टाचार बाहेर पडला असून अनेक उच्चपदस्थांवर यातून कारवाया देखील झाल्या आहेत.

कै. दत्ताजी भाले शैक्षणिक संकुलामध्ये भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचा 75 वा संस्था वर्धापनदिन संपन्न

अंबड प्रतिनिधी : भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचा 75 वा संस्था वर्धापन दिन अतिशय उत्साही वातावरणात संपन्न झाला. या दिनानिमित्त व्यासपीठावर उपस्थित आजच्या कार्यक्रमाचे अध्यक्षा मा. सौ.ज्योतीभाभी ठाकूर (उपाध्यक्ष-भारतीय शिक्षण प्रसारक संस्था अंबाजोगाई), मा . श्री.डॉ. राजेंद्रजी भाला (सदस्य- स्थानिक व्यवस्था मंडळ) ,मा. श्री.रमेशभाऊ बुंदेलखंडे (सन्माननीय सदस्य-स्थानिक व्यवस्था मंडळ) , मा.श्री. सुधाकरजी घायतडक सर (माध्यमिक विभाग मुख्याध्यापक), श्री प्रदीप जोशी सर (मुख्याध्यापक, प्राथमिक विद्यालय) हे उपस्थित होते.

या कार्यक्रम प्रसंगी सर्वप्रथम



भारतमाता, कै. दत्ताजी भाले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर मा. श्री. डॉ.राजेंद्रजी भाला यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर राष्ट्रगीत व राज्य गीत हे सांघिक स्वरूपात घेण्यात आले. त्यानंतर संस्था प्रार्थना हे प्रभो आनंददाता श्रीमती.अनुराधा भाकरे मॅडम यांनी सादर केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक मा.श्री.प्रदीप जोशी सर यांनी केले.त्यामध्ये त्यांनी भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचा इतिहास सांगताना सांगितले की चार ध्येयवेडे शिक्षकांनी एकत्र येऊन 28 जून 1951 साली आंबेजोगाई येथे संस्थेची स्थापना केली. आज त्या संस्थेचा वटवृक्षात रूपांतर झाले आहे .या शिक्षण संस्थेत 45000 विद्यार्थी या ठिकाणी शिक्षण घेत आहे. आणि 1500 शिक्षक ज्ञानदानाचे कार्य करत आहे. आज संस्था नावारूपाला येऊन संस्थेची भरभराट झाली आहे . हे संस्थेचे अमृत महोत्सव वर्ष असून या वर्षभरात विविध कार्यक्रम व स्पर्धा विद्यार्थी व शिक्षक यांच्यासाठी असणार असल्याचे त्यांनी सांगितले.

त्यानंतर भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे लोगोचे अनावरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

मा. श्री .डॉ.राजेंद्रजी भाला यांनी कै.दत्ताजी भाले प्राथमिक विद्यालयाचा स्थापनेचा इतिहास थोडक्यात सांगितला आणि विद्यार्थ्यांना आहाराच्या संदर्भात मार्गदर्शन केले. रोज प्राणायाम करणे, सूर्यनमस्कार घालावे व फास्टफूड खाऊ नये. व यानंतर संस्था वर्धापन दिनाच्या सर्वांना शुभेच्छा दिल्या.

अध्यक्षीय समारोपात मा.सौ. ज्योती भाभी ठाकूर बोलताना म्हटले की,येणाऱ्या काळामध्ये भौतिक सुविधांसचा अभाव कमी करून शाळा सुंदर कशी बनवता येईल याबद्दल प्रयत्नशील राहू असे सांगितले संस्थेच्या 75 व्या वर्धापन दिनानिमित्त विविध क्षेत्रात 75 विद्यार्थी कसे चमकतील या दृष्टीने प्रयत्न सर्व शिक्षक आणि मुख्याध्यापक यांनी प्रयत्न करावे असे त्यांनी आपल्या मार्गदर्शनात सांगितले आणि संस्था वर्धापन दिनानिमित्त सर्वांनाशुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ.रेखा देशमुख मॅडम व ऋणनिर्देश श्री. मुख्याध्यापक सुधाकर घायतडक सर यांनी केले. कल्याण मंत्राने कार्यक्रमाची सांगता झाली. या कार्यक्रम प्रसंगी सर्व पदाधिकारी, शिक्षकवृंद, सर्व विद्यार्थी व पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

आमदार प्रकाश सोळंके यांच्या दूरदृष्टीतून 400 कोटींचा अभूतपूर्व निधी मंजूर

ऐतिहासिक किल्ल्याच्या संवर्धनासह रस्ते, पूल आणि सिंचन व्यवस्था होणार बळकट; सर्वसमावेशक विकासकामांनी धारूर तालुक्याचा होणार कायापालट

किल्ले धारूर (प्रतिनिधी) |: माजलगाव-धारूर मतदारसंघाचे आमदार प्रकाशदादा सोळंके यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यातून आणि दूरगामी दृष्टीकोनातून धारूर तालुक्यासाठी कोट्यवधी रुपयांचा भरीव निधी प्राप्त झाला आहे. या निधीमुळे संपूर्ण तालुक्यात खऱ्या अर्थाने विकासाची गंगा पाहायला मिळत आहे. ग्रामीण भागातील दळणवळण यंत्रणा सक्षम करण्यापासून ते ऐतिहासिक वारशाचे जतन, आरोग्य व्यवस्थेचे बळकटीकरण आणि शेतीसाठी हक्काचे पाणी उपलब्ध करून देण्यापर्यंतच्या सर्वसमावेशक विकासकामांना मोठी गती मिळाली आहे. नुकत्याच मंजूर झालेल्या १४ प्रमुख विकासकामांच्या अधिकृत आराखड्यावरून, आमदार सोळंके यांनी धारूर तालुक्याच्या सर्वांगीण प्रगतीचा एक नवा आणि सुवर्ण अध्याय सुरू केल्याचे स्पष्ट होत आहे.

ऐतिहासिक धारूर किल्ल्याचा गौरव आणि दळणवळणाचा महामार्ग

धारूर शहराचे ऐतिहासिक वैभव असलेल्या 'किल्ले धारूर'च्या संवर्धनासाठी तब्बल ११ कोटी रुपयांची भरीव तरतूद करण्यात आली आहे. यामुळे परिसरातील पर्यटन क्षेत्राला आणि पर्यायाने स्थानिक अर्थव्यवस्थेला मोठी चालना मिळणार आहे. यासोबतच, पांढळसिंगी-पिंपळनेर-धारूर-आडस-लोखंडी सावरगाव रस्त्यासाठी २३० कोटी आणि हॅम योजनेअंतर्गत दिंद्रुड-आडस रस्त्यासाठी १२५ कोटी रुपयांचा महाकाय निधी मंजूर करून आमदारांनी दळणवळणाच्या बाबतीत तालुक्यात मोठी क्रांती घडवून आणली आहे.

मंजूर झालेल्या १४ प्रमुख विकासकामे :

किल्ले धारूर संवर्धन (निधी: ११ कोटी रु.) : धारूरच्या ऐतिहासिक किल्ल्याचे जतन, संवर्धन आणि सुशोभीकरण करण्यासाठी हा निधी वापरण्यात येईल. यामुळे ऐतिहासिक वारशाचे रक्षण तर होईलच, शिवाय पर्यटन आणि स्थानिक रोजगाराला मोठी गती मिळेल.

पांढळसिंगी-पिंपळनेर-धारूर-आडस-लोखंडी सावरगाव रस्ता (रामा-२३२, कि.मी. ४८/०० ते ७१/००) (निधी: २३० कोटी रु.) : तालुक्याला जोडणारा हा मुख्य राज्य महामार्ग अत्यंत दर्जेदार व रुंद करण्यात येत आहे. यामुळे अवजड वाहतूक सुलभ होईल, अपघातांचे प्रमाण कमी होईल आणि वेळेची मोठी बचत होईल.

श्री लोणार देवी देवस्थान (कान्नापूर) रस्ता सुधारणा (निधी: २५ लक्ष रु.) : लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या लोणार देवी मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करण्यात येणार असून, यामुळे भाविकांचा प्रवास सुखकर आणि सुरक्षित होणार आहे.



प्राथमिक आरोग्य केंद्र (चिंचपूर) परिसर सुधारणा (निधी: ३० लक्ष रु.): ग्रामीण आरोग्य यंत्रणेला आधुनिक रूप देण्यासाठी चिंचपूर प्राथमिक आरोग्य केंद्राच्या परिसरात अंतर्गत रस्ते, नाली बांधकाम आणि सुरक्षिततेसाठी भक्कम संरक्षण भिंत उभारण्यात येत आहे.

आंबेवडगाव येथील पशुवैद्यकीय दवाखाना इमारत बांधकाम (निधी: ५५ लक्ष रु.) : शेतकरी बांधवांच्या पशुधनाला वेळेवर व दर्जेदार उपचार मिळावेत, यासाठी आंबेवडगाव येथे सर्व सोयी-सुविधांनी सुसज्ज अशा नवीन पशुवैद्यकीय दवाखान्याची इमारत साकारत आहे.

चिखली ते जैतापूर रस्ता सुधारणा व नळकांडी पूल (निधी: २० लक्ष रु.) : पावसाळ्यात चिखली ते जैतापूर दरम्यानच्या नाल्यामुळे गावांचा संपर्क तुटू नये, यासाठी येथे आधुनिक नळकांडी पूल आणि रस्ता सुधारणेचे काम हाती घेण्यात आले आहे.

इजिमा १३४ (भायजळी) ते ग्रामा १२७ रस्ता जोडणी (निधी: ७० लक्ष रु.) : ग्रामीण भागातील अंतर्गत वाड्या-वस्त्यांना मुख्य प्रवाहाशी जोडण्यासाठी या संपर्क रस्त्याचे मजबुतीकरण आणि डांबरीकरण केले जात आहे.

चारदरी ते घागरवाडा ते अंबाचौडी रस्ता सुधारणा (कि.मी. १५/४०० ते १६/००) (निधी: ८० लक्ष रु.) : अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या या दुर्गम भागातील रस्त्याची दुरवस्था दूर करून स्थानिक नागरिकांना आणि प्रवाशांना मोठा दिलासा दिला जात आहे.

आंबेवडगाव ते धुनकवाड रस्ता सुधारणा (निधी: २० लक्ष रु.) : दोन महत्त्वाच्या गावांना परस्परांशी जोडणारा हा रस्ता अत्यंत सुटसुटीत, दर्जेदार व सुरक्षित करण्यात येणार आहे.

मोहवेंड येथे कोल्हापुरी पद्धतीचा बंधारा (निधी: ८० लक्ष रु.) : शेती सिंचनासाठी अत्यंत महत्त्वाचा ठरणारा हा बंधारा मोहवेंड परिसरात भूजल पातळी वाढवण्यासाठी आणि शेतकऱ्यांना रब्बी पिकांसाठी हक्काचे पाणी मिळवून देण्यासाठी वरदान ठरेल.

हिंगणी खुर्द येथे सिमेंट नाला बांध (निधी: ५० लक्ष रु.) : जलसंधारणाच्या माध्यमातून पाणी अडवण्यासाठी हिंगणी खुर्द येथे सिमेंट बंधारा बांधला जात असून, यामुळे परिसरातील विहिरींच्या आणि कूपनलिकांच्या पाणीपातळीत लक्षणीय वाढ होईल.

आवरगाव परिसरात भव्य पुलाचे बांधकाम (निधी: ३ कोटी रु.) : आवरगाव परिसरातील नदी/नाल्यावर मोठ्या पुलाचे बांधकाम होत असल्याने, पावसाळ्यात गावांचा तुटणारा संपर्क आता कायमस्वरूपी जोडला जाणार आहे.

अंजनडोह येथे पुलाचे बांधकाम (निधी: ४ कोटी रु.) : अंजनडोह येथील ४ कोटींच्या या भव्य पुलामुळे परिसरातील शेतकऱ्यांना आपला शेतमाल वेळेत बाजारात नेणे आणि विद्यार्थ्यांना शाळेत जाणे अत्यंत सोपे व सुरक्षित होणार आहे.

हॅम योजनेअंतर्गत दिंद्रुड ते आडस रस्ता (निधी: १२५ कोटी रु.) : 'हायब्रिड ॲन्यूइटी मॉडेल' अंतर्गत होणारा हा भव्य आणि अत्याधुनिक रस्ता तालुक्याच्या आर्थिक, औद्योगिक आणि व्यापारी विकासाला नवी गती देणारा ठरेल.

सर्वसामान्यांतून व्यक्त होतोय आनंद

आमदार प्रकाश सोळंके यांच्या या विकासकार्यामुळे धारूर तालुक्याच्या ग्रामीण व शहरी भागाचे चित्र पूर्णपणे बदलत आहे. कोट्यवधी रुपयांच्या या विकासकामांचे नियोजन प्रत्यक्ष जमिनीवर उतरत असल्याने सर्वसामान्य जनता, शेतकरी, व्यापारी आणि तरुण वर्गामध्ये अत्यंत आनंदाचे व समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. "दिलेला शब्द प्रत्यक्ष कृतीत उतरवणारा विकासाभिमुख नेता" म्हणून आमदार सोळंके यांच्या नेतृत्वाचे कौतुक आज सर्व थरांतून होत आहे.

CMYK

धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

१३ वर्षीय अल्पवयीन मुलीचा बालविवाह करून लैंगिक अत्याचार

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.२९ जून -

वाशी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एका गावात १३ वर्षे ५ महिने वयाच्या अल्पवयीन मुलीचा बालविवाह लावून देऊन तिच्यावर लैंगिक अत्याचार झाल्याची गंभीर घटना समोर आली आहे.

या प्रकरणी पीडितेच्या फिर्यादीवरून संबंधित पतीसह तिचे आई-वडील आणि सासू-सासरे अशा पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडिता अल्पवयीन असल्याची जाणीव असतानाही तिच्या आई-वडिलांनी तिचा एका तरुणाशी बालविवाह लावून दिला. त्यानंतर संबंधित तरुणाने तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे.

हा प्रकार २०२४ पासून २८ जून २०२६ रोजी पहाटे सुमारे १२.३० वाजेपर्यंत घडल्याचे नमूद करण्यात आले आहे.

याप्रकरणी वाशी पोलीस गुन्हा दाखल करण्यात आलन असून पुढील तपास पोलीस करीत आहेत.

संक्षिप्त वृत्त...



लक्ष्मण शिंदे यांना 'क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले समाजरत्न पुरस्कार'

धाराशिव, २९ जून -

महाराष्ट्र पोलीस मित्र सोशल असोसिएशनच्या वतीने सन २०२६ चा प्रतिष्ठेचा 'क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले समाजरत्न पुरस्कार' लक्ष्मण शिंदे-पाटील यांना सहपरिवार प्रदान करण्यात आला. या पुरस्कार वितरण सोहळ्यास माजी खासदार डॉ. सुनील गायकवाड, शिक्षक आमदार विक्रम काळे, महाराष्ट्र पोलीस मित्र सोशल असोसिएशनचे संस्थापक तथा प्रदेशाध्यक्ष सुफी शमशोद्दीन सय्यद तसेच प्रसिद्ध सिने अभिनेत्री मैथाली वारंग यांची प्रमुख उपस्थिती होती. समाजाभिमुख पत्रकारितेतील उल्लेखनीय कार्याची दखल घेत शिंदे-पाटील यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी त्यांना शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह आणि सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले.

वंदना डोंगरे यांचे निधन

तुळजापूर, २९ जून -

पुजारी नगर सोसायटी येथील रहिवासी श्रीमती वंदना हनुमंत डोंगरे (वय ६५) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर रविवारी दुपारी २ वाजता घाटशीळ रोड येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्या धाराशिव येथील अधीक्षक धाराशिव पाटबंधारे मंडळ, जलसंपदा विभागाचे विनोद डोंगरे यांच्या मातोश्री होत. त्यांच्या पश्चात मुलगा, सुना व नातवंडे असा परिवार आहे.



ढोकीत किराणा दुकान फोडून १.८६ लाखांचा मुद्देमाल लंपास

धाराशिव, २९ जून -

धाराशिव तालुक्यातील रुई ढोकी येथील एका किराणा दुकानात अज्ञात चोरट्याने पत्रा उचकटून प्रवेश करत तब्बल १ लाख ८६ हजार ४९९ रुपयांचा मुद्देमाल चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी ढोकी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, अभिजीत बाळासाहेब फंड (वय ३३, रा. रुई ढोकी, ता. जि. धाराशिव) यांच्या त्रिमूर्ती एंटरप्रायजेस व माऊली किराणा दुकानाच्या पाठीमागील पत्रा अज्ञात व्यक्तीने उचकटून आत प्रवेश केला. चोरट्याने दुकानातील तेलाचे डबे, तेलाचे बॉक्स, साबुदाणा, भगर, शेंगदाणे, विक्रम चहा, कोलगेट कंपनीची उत्पादने, निरमा पावडर तसेच विविध कंपनींचे साबण असा एकूण १,८६,४९९ रुपयांचा माल चोरून नेला.

गावागावातील समस्या जाणून घेणार

माजी मंत्री मधुकरराव चव्हाण यांचा 'राजकारण विरहित संवाद दौरा'; ग्रामस्थांच्या प्रश्नांना देणार प्राधान्य

तभा वृत्तसेवा
तुळजापूर, दि.२९ जून -

तालुक्यातील गावागावातील नागरिकांच्या मूलभूत समस्या प्रत्यक्ष जाणून घेऊन त्या प्रशासनाच्या माध्यमातून मार्गी लावण्यासाठी माजी मंत्री मधुकरराव चव्हाण यांनी 'राजकारण विरहित संवाद दौरा' हाती घेण्याचा निर्णय घेतला आहे. या दौऱ्याद्वारे ते विविध गावांना भेटी देऊन ग्रामस्थ, शेतकरी, महिला, युवक आणि स्थानिक पदाधिकाऱ्यांशी थेट संवाद साधणार आहेत.



पत्रकारांशी संवाद साधताना मधुकरराव चव्हाण म्हणाले की, तुळजापूर तालुक्यात सध्या अनेक प्रश्न गंभीर स्वरूपात समोर येत आहेत. पावसाने जवळपास महिनाभर दडी मारल्याने शेतकरी चिंतेत असून खरीप हंगामावर संकट निर्माण झाले आहे. याशिवाय ग्रामीण भागातील रस्त्यांची दुरवस्था, पिण्याच्या पाण्याची समस्या, वीजपुरवठ्यातील अडचणी, आरोग्य सुविधा, शिक्षण, सिंचन आणि इतर मूलभूत प्रश्नांबाबत नागरिकांकडून सातत्याने तक्रारी येत असल्याचे त्यांनी सांगितले.

दररोज अनेक ग्रामस्थांचे फोन येतात. प्रत्येक प्रश्नावर फोनवर चर्चा करण्यापेक्षा संबंधित गावात जाऊन प्रत्यक्ष परिस्थिती पाहणे अधिक महत्त्वाचे आहे. त्यामुळे गावागावात जाऊन नागरिकांशी थेट संवाद साधण्याचा निर्णय घेतला आहे. हा दौरा कोणत्याही राजकीय हेतूने नसून जनतेच्या प्रश्नांसाठी आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. या संवाद दौऱ्यात नागरिकांना त्यांच्या समस्या, अडचणी आणि विकास कामांबाबतच्या अपेक्षा थेट मांडण्याची संधी मिळणार आहे. ग्रामपंचायत स्तरावरील प्रलंबित कामे, रस्ते, पाणी, वीज, शेतकऱ्यांच्या समस्या, शासकीय योजनांची अंमलबजावणी तसेच युवक आणि महिलांच्या प्रश्नांवर चर्चा करण्यात येणार आहे.

> माझ्या राजकीय प्रवासात तुळजापूर तालुक्यासह ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासाला सर्वोच्च प्राधान्य दिले आहे. पाणीटंचाई दूर करण्यासाठी साठवण तलाव, पाझर तलाव आणि जलसंधारणाची विविध कामे केली. गावोगावी सभागृह उभारणी, रस्त्यांचे जाळे, शेतकऱ्यांसाठी वीज सुविधा आणि सिंचन व्यवस्था मजबूत करण्यावर भर दिला. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी शैक्षणिक संस्थांचाही विस्तार करण्यात आला, असे मधुकरराव चव्हाण यांनी सांगितले.

गावभेटीदरम्यान समोर आलेल्या प्रत्येक प्रश्नाची नोंद घेऊन संबंधित विभागाचे अधिकारी, प्रशासन, लोकप्रतिनिधी आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संवाद साधून प्रश्न मार्गी लावण्यासाठी सातत्याने पाठपुरावा केला जाईल, असेही चव्हाण यांनी सांगितले. तुळजापूर तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी लोकसहभाग आवश्यक असल्याचे सांगत त्यांनी नागरिकांनी कोणताही संकोच न बाळगता आपल्या समस्या मांडाव्यात, असे आवाहन केले आहे.

यावेळी मुकुंद डोंगरे, अमर मगर, रसिक वाले, विलास सरडे, लालासाहेब मगर, तुळशीदास साखरे, रवी कापसे, तानाजी जाधव, दीपक जाधव, परमेश्वर कराळे, बाळासाहेब जाधव, प्रभाकर पाटील, बाबासाहेब जाधव यांच्यासह पत्रकार व कार्यकर्ते उपस्थित होते.

तुळजापुरात 'राज्यमाता गोमाता संवाद यात्रा'चे आगमन



तभा वृत्तसेवा
तुळजापूर, दि.२९ जून -

गोसंवर्धन, गोसेवा आणि भारतीय संस्कृतीतील गोमातेचे महत्त्व जनमानसात रुजविण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या 'राज्यमाता-गोमाता संवाद यात्रा' रथाचे तुळजापूर येथे रविवारी (दि.२२) सकाळी आगमन झाले.

यावेळी उपस्थित मान्यवर व गोसेवकांनी श्री तुळजाभवानी मंदिरात जाऊन विधिवत पूजा-अर्चा केली. पशुसंवर्धन आयुक्तालय, औंध (पुणे) येथून २२ जून रोजी या यात्रेला प्रारंभ झाला असून ही यात्रा १५ दिवसांत सुमारे सहा हजार किलोमीटरचा प्रवास करणार आहे. या यात्रेद्वारे सुमारे १५०० गोशाळा संचालक, गोरक्षक, गोपालक आणि शेतकऱ्यांशी संवाद साधला जाणार आहे. राज्यातील ३५ जिल्ह्यांमध्ये यात्रेचे संचलन होणार असून सुमारे १००० गोशाळांचा यात सहभाग राहणार आहे. यात्रेचा प्रचार व प्रसार करून नागपूर येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते यात्रेची सांगता होणार आहे.

यावेळी महाराष्ट्र गोसेवा आयोगाचे अध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा) शेखर मुंदडा, नितीन चिलवंत, किशोर गंगणे, डॉ. सुनील सूर्यवंशी, उद्धव नेरकर, मुकुंद शिंदे, दर्शन मुंदडा, संजय पराडे तसेच पशुसंवर्धन विभागाचे कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

२० वर्षांनंतर हगलुर गावात एसटी बस दाखल; ग्रामस्थांचा जल्लोष



तभा वृत्तसेवा
नळदुर्ग, दि.२९ जून -

तुळजापूर तालुक्यातील हगलुर गावात तब्बल २० वर्षांनंतर महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाची बस रविवारी (दि. २९) दाखल झाली. हगलुरचे सरपंच ड. जयपाल पाटील यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे तसेच भाजपचे युवा नेते मल्हार राणा जगजितसिंह पाटील यांच्या प्रयत्नातून हगलुर-नळदुर्ग बससेवा सुरू करण्यात आली.

या बससेवेचा लाभ हगलुर, मनेवाडी तसेच साखर कारखाना परिसरातील शिक्षणासाठी बाहेर जाणाऱ्या विद्यार्थ्यांना होणार आहे. बससेवा सुरू झाल्याच्या आनंदात ग्रामस्थांनी बसची मिरवणूक काढून वाहतूक नियंत्रक अनिल हांडे, चालक मेहराज पटेल आणि वाहक विष्णु माळी यांचा सत्कार केला.

यापूर्वी विद्यार्थ्यांना दोन ते तीन किलोमीटर पायी चालत महामार्गावर जावे लागत होते. आता गावातूनच बससेवा उपलब्ध झाल्याने विद्यार्थ्यांचा त्रास कमी झाला असून त्यांनी समाधान व्यक्त केले आहे.

ही बस सकाळी ९ वाजता हगलुर येथून सुटणार असून शाळा सुटल्यानंतर संध्याकाळी नळदुर्गहून परत गावात येणार आहे.

काँग्रेस पक्षाला तालुक्यात पुन्हा नंबर एकवर आणण्यासाठी प्रयत्न करणार

ॲड. अरविंद बेडगे

तभा वृत्तसेवा
नळदुर्ग, दि.२९ जून -

पक्षाने माझ्यावर दाखविलेल्या विश्वासाला तडा जाऊ न देता तुळजापूर तालुक्यात पुन्हा एकदा काँग्रेस पक्षाला राजकारणात नंबर एकवर आणण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे काँग्रेस पक्षाचे नवनियुक्त तुळजापूर तालुका अध्यक्ष ॲड. अरविंद बेडगे यांनी सांगितले.

नळदुर्ग येथील ॲड. बेडगे यांची काँग्रेस पक्षाच्या तुळजापूर तालुका अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. नळदुर्गमधील व्यक्तीची काँग्रेस पक्षाच्या तालुका अध्यक्षपदी नियुक्ती होण्याची ही पहिलीच वेळ असल्याचे बोलले जात आहे. या नियुक्तीत ॲड. धीरज पाटील यांचे विशेष योगदान असल्याचेही यावेळी सांगण्यात आले. दि.२९ जून रोजी नवनियुक्त तालुकाध्यक्ष ॲड. बेडगे यांचा नळदुर्ग शहर पत्रकार संघ, काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्त्यांच्या वतीने सत्कार करण्यात आला. सत्कार समारंभात बोलताना ॲड. बेडगे म्हणाले की, काँग्रेस पक्षाने माझ्यावर जो विश्वास दाखविला आहे, त्याला मी तडा जाऊ देणार नाही. तालुकाध्यक्ष म्हणून काम करताना येणाऱ्या काळात संपूर्ण तालुक्याचा दौरा करून पक्ष संघटना अधिक मजबूत करण्यासाठी प्रयत्न करणार आहे. तसेच तालुक्यात पुन्हा काँग्रेस पक्षाला बळकटी मिळावी आणि राजकारणात पक्ष अग्रस्थानी यावा यासाठीही आपण कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले.



कार्यक्रमास संदीप सुरवसे, रहेमान कुरेशी, बेडगे, विशाल डुकरे, हर्षल डुकरे, सुहास येडगे, तानाजी जाधव, विलास येडगे, दादासाहेब बनसोडे, रघुनाथ नागणे, अंबादास पवार, शिवव्या स्वामी यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

समाजोपयोगी उपक्रमांनी आकाश कुलकर्णी यांचा वाढदिवस साजरा

तभा वृत्तसेवा
नळदुर्ग, दि.२९ जून -

नळदुर्ग नगरपालिकेचे नगरसेवक आकाश कुलकर्णी यांच्या ३५ व्या वाढदिवसानिमित्त विविध समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. वाढदिवसाचे औचित्य साधून होटी (ता. तुळजापूर) येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर अस्थिव्यंग निवासी विद्यालयातील दिव्यांग विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले.

यावेळी विद्यार्थ्यांसमवेत व शिक्षकांच्या उपस्थितीत नगरसेवक आकाश कुलकर्णी यांनी साधेपणाने आपला वाढदिवस साजरा केला. त्यानंतर नळदुर्ग येथील उपजिल्हा रुग्णालयात क्षयरोग (टीबी) उपचार घेत असलेल्या दहा रुग्णांना अत्यावश्यक जीवनावश्यक साहित्याच्या किटचे वितरण करण्यात आले. समाजातील गरजू घटकांच्या पाठीशी उभे राहण्याचा संदेश या उपक्रमातून नगरसेवक आकाश कुलकर्णी यांनी दिला. वाढदिवस हा केवळ उत्सव न राहता समाजसेवेचे प्रभावी माध्यम बनावे, या उद्देशातून या उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उपस्थितांनी नगरसेवक आकाश कुलकर्णी यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देत त्यांच्या सामाजिक कार्याचे कौतुक केले. भविष्यातही अशाच प्रकारचे जनहिताचे उपक्रम त्यांनी राबवावेत, अशी अपेक्षाही व्यक्त करण्यात आली.



या प्रसंगी नगरसेवक आकाश कुलकर्णी, नगरपालिकेतील काँग्रेस पक्षाचे गटनेते मारुती खारवे, नगरसेवक सुधीर पोतदार, माजी नगरसेवक शरद बागल, नारायण दोपारे, अमित शेंडगे, प्रविण चव्हाण, प्रशांत चव्हाण, शाम बागल, लखन भोसले, आदित्य भोसले, उदय भुमकर, बाळू कोने, अजित दोपारे, अंकुश जाधव, नितीन भोसले, अभिषेक हुलगे, सारंग जोशी, विशाल कलशेट्टी तसेच न्यू चैतन्य तरुण मंडळाचे कार्यकर्ते उपस्थित होते.

नगरसेवक आकाश कुलकर्णी हे कायम समाजकार्यात सक्रिय असतात. त्यांनी त्यांच्या प्रभाग क्रमांक ४ मध्ये नगरपालिकेच्या निधीची प्रतीक्षा न करता नागरिकांच्या गरजा लक्षात घेऊन स्वखर्चातून दोन ते तीन ठिकाणी सीडी वर्कची कामे केली आहेत. त्यामुळे प्रभागातील नागरिक त्यांच्या समाधान व्यक्त करत आहेत.

विद्यार्थ्यांसाठी बससेवा सुरू; तांड्यांवरील विद्यार्थ्यांना दिलासा

तभा वृत्तसेवा
अणदूर, दि.२९ जून -

पुजारी तांडा, पाटील तांडा व धनगरवाडी तांडा येथील विद्यार्थ्यांसाठी अखेर बससेवा सुरू करण्यात आली असून यामुळे शिक्षणासाठी अणदूर व नळदुर्ग येथे जाणाऱ्या सुमारे ६५ विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

या तांड्यांवरील विद्यार्थ्यांना वाहनाची सुविधा नसल्याने दररोज पायी, सायकल किंवा अन्य पर्यायांचा वापर करून शाळेत जावे लागत होते. या विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी बससेवा सुरू करण्याची मागणी जिल्हा परिषद सदस्य डॉ. जितेंद्र कानडे यांनी परिवहन महामंडळाकडे केली होती. त्यांच्या पाठपुराव्याला यश मिळाल्याने ही बससेवा सुरू करण्यात आली.



पहिल्या बसचे पूजन अणदूरचे सरपंच रामचंद्र आलुरे व जिल्हा परिषद सदस्य डॉ. जितेंद्र कानडे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ग्रामपंचायत सदस्य बाळकृष्ण घोडके पाटील, बालाजी घुगे, प्रगतिशील शेतकरी सिद्धराम धमूरे, मुख्याध्यापक गोपाळ कुलकर्णी तसेच विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या मार्गावर इतिहासात प्रथमच बससेवा सुरू झाल्याने परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

गुणवत्ता असेल तर यश नक्की मिळते : खा. ज्योती वाघमारे

ज्ञानज्योती फाऊंडेशनतर्फे गुणवंत विद्यार्थी सत्कार व ज्ञानज्योती पुरस्कार वितरण सोहळा संपन्न...



तभा वृत्तसेवा
उमरगा, दि.२९ जून -

ज्ञानज्योती फाऊंडेशन, उमरगा आयोजित गुणवंत विद्यार्थी सत्कार व ज्ञानज्योती पुरस्कार वितरण सोहळा रविवार दि. २८ फेब्रुवारी २०२९ रोजी शांताई मंगल कार्यालय, उमरगा येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

या कार्यक्रमात उमरगा व लोहारा तालुक्यातील इयत्ता १० वी व १२ वी परीक्षेत यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच विद्यार्थ्यांसाठी करिअर मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले. विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांना ज्ञानज्योती पुरस्कार प्रदान करण्यात आले. याचबरोबर गरीब व होतकरू विद्यार्थ्यांसाठी बाळासाहेब ठाकरे शैक्षणिक अर्थसहाय्य शिष्यवृत्ती योजनेची सुरुवात करण्यात आली.

उपस्थित विद्यार्थी, पालक व शिक्षकांना मार्गदर्शन करताना खासदार ज्योतीताई वाघमारे यांनी विद्यार्थ्यांना परिस्थितीला दोष न देता सातत्याने अभ्यास करण्याचे आवाहन केले. विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्ता असेल आणि त्यांनी चिकाटीने प्रयत्न केले तर यश निश्चित मिळते, असे त्यांनी सांगितले. यावेळी डॉ. विजयकुमार फड यांनीही विद्यार्थ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे उद्घाटन व दीपप्रज्वलन माजी आमदार व शिवसेना उपनेते ज्ञानराज चौगुले यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून जेष्ठ शिवसेना नेते जितेंद्र दादा शिंदे, जिल्हा परिषद उपाध्यक्षा उषाताई गायकवाड, नगराध्यक्ष किरण गायकवाड, लोहारा पंचायत समिती सभापती पल्लवी जानकर, उपसभापती अमोल पाटील, लोहारा नगराध्यक्षा वैशाली खराडे, गटशिक्षणाधिकारी अमोल राजपूत, गटशिक्षणाधिकारी शिवकुमार बिराजदार यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

यावेळी ज्ञानज्योती पुरस्काराने सुनील माने (बेडगा), प्रवीणचंद्र तोतला (उमरगा), शेखर घंटे (नारंगवाडी), रसिका कटकधोंड (केसरजवळगा), गिरीष भगत (लोहारा) आणि संतोष शिंदे (मुळज) यांचा सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक ॲड. आकांक्षा चौगुले यांनी केले, तर अध्यक्षीय समारोप माजी खासदार प्रा. रविंद्र गायकवाड यांनी केला. सूत्रसंचालन संतोष पवार व संदीप जगताप यांनी केले, तर आभार प्रदर्शन विजय वडदरे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शिवसेना जिल्हाप्रमुख मोहन पणुरे, तालुकाप्रमुख बळीराम सुरवसे, जगन्नाथ पाटील, फाऊंडेशनचे उपाध्यक्ष विजय वडदरे, सचिव प्रदीप मदने व कोषाध्यक्ष अमर देशटवार यांनी विशेष परिश्रम घेतले.

कार्यक्रमास उमरगा व लोहारा तालुक्यातील गुणवंत विद्यार्थी, पालक व शिक्षणप्रेमी नागरिक उपस्थित होते.

मातृसंस्कार समाज आणि राष्ट्राला दिशा देतात : हभप. पुरुषोत्तम महाराज पाटील

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.२९ जून -

कै. रुपाबाई विश्वनाथराव गुंड यांच्या २३ व्या पुण्यस्मरणानिमित्त आयोजित सुश्राव्य कीर्तनात हभप. पुरुषोत्तम महाराज पाटील यांनी 'आई' या विषयावर हृदयस्पर्शी निरूपण करत मातृसंस्कारांचे महत्त्व अधोरेखित केले.



यावेळी बोलताना महाराज म्हणाले, आई ही केवळ जन्म देणारी नसून ती संस्कारांची पहिली शाळा असते. आईच्या विचारांवरच कुटुंबाची दिशा ठरते. धर्मनिष्ठा, राष्ट्रभक्ती आणि समाजसेवेचे संस्कार देणाऱ्या माता खऱ्या अर्थाने धन्य असतात.

प्रवचनादरम्यान त्यांनी कै. रुपाबाई गुंड यांनी कुटुंबावर केलेल्या संस्कारांचा विशेष उल्लेख करत १९९२ मधील अयोध्या श्रीराम जन्मभूमी आंदोलनातील त्यांच्या सहभागाचा गौरवपूर्ण संदर्भ दिला. त्यांच्या प्रेरणेने गुंड परिवाराने धर्म, समाज व राष्ट्रकार्यात दिलेल्या योगदानाचेही कौतुक केले.

महाराजांच्या प्रेरणादायी आणि भावनिक निरूपणामुळे उपस्थित भाविक भारावून गेले. या कार्यक्रमास सुधाकर गुंड गुरुजी, ॲड. व्यंकट गुंड पाटील, वसंतराव नागदे, ॲड. पांडुरंग लोमटे महाराज तसेच वारकरी संप्रदायातील मंडळी व पंचक्रोशीतील हजारो भाविक उपस्थित होते.